


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026
मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १२१ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# आयुक्तपदी अश्विनी भिडेंचं नाव निश्चित

## शहराला मिळणार पहिली महिला आयुक्त

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्याचं लक्ष लागून असलेल्या मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदासाठी नाव निश्चित झाल्याचं समोर आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतल्या आणि मेट्रो वूमन अशी ओळख असलेल्या अश्विनी भिडे यांचं नाव मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदसाठी निश्चित झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अश्विनी भिडे या सध्या मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत असून मंगळवारी त्यांच्या नावाची घोषणा होणार असल्याची माहिती आहे.

मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी हे 31 मार्च रोजी निवृत्त होणार आहेत. त्यांच्या ठिकाणी आता अश्विनी भिडे यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती आहे. अश्विनी भिडे या 1995 बॅचच्या आयएएस अधिकारी असून या आधी त्यांनी अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात सोमवारी संध्याकाळी एक बैठक संपन्न झाली होती. या बैठकीत दोन नावं होती चर्चेत, ज्यात असिम गुप्ता आणि अश्विनी भिडेंची चर्चा होती. मात्र शेवटी अश्विनी भिडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.



सुरुवातीला अश्विनी भिडे यांच्या नावाला राज्याचे उपमुख्यमंत्री आणि नगरविकास खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाचा विरोध असल्याची चर्चा होती. मात्र सोमवारी रात्री अश्विनी भिडे यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या दोघांमध्ये सुमारे एक तास चर्चा झाल्याची माहिती समोर आली. यानंतर अश्विनी भिडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा आहे.

अश्विनी भिडे या मुख्यमंत्र्यांच्या मर्जीतल्या अधिकारी असून त्यांनी मुंबई मेट्रो आणि कोस्टल रोड प्रोजेक्टच्या उभारणीत महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे. मुंबई महापालिका आयुक्तपदासाठी अश्विनी भिडे यांच्यासोबत मिलिंद म्हैसकर, असीम गुप्ता, संजय मुखर्जी यांचीही नावं चर्चेत होती. परंतु, या तीनही अधिकाऱ्यांची सेवाज्येष्ठता डावलून अश्विनी भिडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती आहे.

मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदी निवड होणाऱ्या अश्विनी भिडे या पहिल्या महिला अधिकारी ठरणार आहेत. या आधी त्यांनी मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदाची धुराही सांभाळली आहे. अश्विनी भिडे यांना आयुक्तपदाचा तीन वर्षांचा पूर्ण कार्यकाळ मिळणार आहे.

मुंबई महापालिकेच्या महापौरपदी एक महिला आहेत आणि त्याचवेळी आयुक्तपदीही महिलेची नियुक्ती होणार असल्याने महापालिकेवर महिला राज आल्याची चर्चा आहे. गेल्या काही काळापासून मुंबई महापालिकेच्या प्रशासनावर सातत्याने भ्रष्टाचाराचे होत आहे. त्या पार्श्वभूमीवर आयुक्तपदाची जबाबदारी अश्विनी भिडे यांच्याकडे आल्याने, महापालिका प्रशासनाची प्रतिमा सुधारण्याचं महत्त्वाचं आव्हान त्यांच्यासमोर असेल.

## थोडक्यात...

### नगर अर्बन बँक गैरव्यवहार प्रकरण; मालमत्ता जप्त

अहिल्यानगर : अवसायनात निघालेल्या नगर अर्बन सहकारी बँकेच्या ( बहुराष्ट्रीय) गैरव्यवहार प्रकरणी गुन्हा दाखल झालेले 9 माजी संचालक, तीन माजी अधिकारी, कर्जदार व ज्यांच्या खात्यांवर व्यवहार झाल्याचा ठपका ठेवण्यात आला अशा एकूण 28 आरोपींच्या 72 मालमत्ता राज्य सरकारने 'एमपीडीए' कायद्यानुसार जप्त केल्या आहेत. या मालमत्तांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य सरकारने अहिल्यानगरच्या उपविभागीय दंडाधिकारी यांची नियुक्ती केली आहे. यासंदर्भात गृह विभागाचे सचिव अनुप कुमार सिंह यांनी राजपत्रात ही माहिती प्रसिद्ध केली आहे. बँक बचाव कृती समितीचे राजेंद्र गांधी, राजेंद्र चोपडा व ॲड. अच्युत पिंगळे यांनी ही माहिती आज, सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी समितीचे डी. एम. कुलकर्णी व मनोज गुंदेचा उपस्थित होते. या जप्त केलेल्या मालमत्तांचे व्यवहार होऊ नयेत तसेच त्यावर राज्य सरकारचे नाव लावावे या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार असल्याचे समितीकडून सांगण्यात आले.

### कोंबड्यांच्या झुंजीवर पोलिसांचा छापा

अहिल्यानगर : जुगार पद्धतीने चालवल्या जाणाऱ्या व मंडप टाकून आयोजित केलेल्या कोंबड्यांच्या झुंजीच्या ठिकाणी पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून तब्बल 21 जणांना अटक केली. या झुंजीमध्ये 60 ते 70 जण सहभागी होते. त्यातील अनेकजण पसार झाले. या झुंजीसाठी आंध्रप्रदेश, तमिळनाडू व तेलंगाना येथून कोंबड्या आणण्यात आल्या होत्या. अहिल्यानगर शहराजवळील पोखर्डी शिवारातील पिंपळगाव उजनी गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मंडप टाकून या कोंबड्यांच्या झुंजी आयोजित करण्यात आल्या होत्या. तेथे ही कारवाई करण्यात आली. अटक केलेल्या आरोपींमध्ये अहिल्या नगर शहरासह नाशिक, पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर येथील काहीजणांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी दिली.

### 6 टक्के अपंगांनाच व्यवस्था सुलभ

मुंबई : राष्ट्रीय दिव्यांग रोजगार प्रोत्साहन केंद्राच्या ('नॅशनल सेंटर फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसएबल्ड पीपल) अभ्यासानुसार, राज्यातील केवळ 6 टक्के अपंगांनाच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था रोजच्या प्रवासाकरिता सुलभ वाटते. 'दिव्यांग हक्क कायदा, 2016' लागू होऊन 10 वर्षे झाली तरीही सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत अनेक त्रुटी आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील अडचणींमुळे अनेक अपंग शिक्षण, आरोग्यसेवा आणि रोजगारापासून वंचित राहत आहेत.

# इराण युद्धात सहभागी विमानांना स्पेनच्या आकाशात 'नो एंट्री'



## युद्ध अन्याय्य असल्याच्या भूमिकेवर स्पेन ठाम

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

अमेरिका आणि इराण यांच्यात गेल्या काही आठवड्यांपासून संघर्ष सुरू आहे. या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर स्पेनने अमेरिका आणि इराणच्या विरोधात भूमिका घेतली आहे. स्पेनने इराण युद्धात सहभागी असलेल्या अमेरिकेच्या विमानांसाठी आपली हवाई हद्द बंद केली आहे. स्पेनच्या संरक्षण मंत्री मार्गरिटा रोब्लेस यांनी सोमवारी याबद्दल माहिती दिली आहे. स्पेनने यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, अमेरिका संयुक्तपणे ऑपरेट केल्या जाणाऱ्या लष्करी तळांचा इराणमधील संघर्षात वापर करू शकणार नाही. तसेच स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ हे या युद्धाबाबत बोलताना, ते बेकायदेशीर, बेपर्वा आणि अन्याय्य असल्याचे म्हणाले होते. त्यानंतर आता स्पेनच्या संरक्षण मंत्री रोब्लेस यांनी सोमवारी स्पेनच्या हवाई क्षेत्राचा या संघर्षात वापर करण्याबाबतही तोच तर्क लागू होतो, असे म्हणत स्पेनची भूमिका पुन्हा एकदा स्पष्टकेली आहे.

"अमेरिकन लष्कर आणि सैन्याला हे सुरुवातीपासूनच अगदी स्पष्ट करण्यात आले होते. त्यामुळे इराण युद्धासंबंधीत कोणत्याही कारवाईसाठी ना आमच्या लष्करी तळांच्या वापराला परवानगी आहे, ना स्पॅनिश हवाई क्षेत्राच्या वापराला," असे रोब्लेस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. स्पेनमधील वृत्तपत्र El Pais ने लष्कराच्या सूत्रांचा हवाला देत स्पेनची हवाई हद्द बंद केल्याचे वृत्त दिले आहे.

सांचेझ यांच्या नेतृत्वाखालील स्पेनच्या सरकारकडून अमेरिका आणि इस्रायलच्या मध्यपूर्वेतील लष्करी कारवायांना युरोपातून सातत्याने विरोध दर्शवला जात आहे. दरम्यान सांचेझ यांच्या सरकारने अमेरिकाला दक्षिण स्पेनमधील Rota आणि Morón या लष्करी तळांचा वापर करू देण्यास नकार दिला आहे. त्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पेनबरोबरचा व्यापार बंद करण्याचा इशारा दिला आहे. दुसरीकडे, स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ हे इस्रायलच्या गाझामधील युद्धावर देखील सातत्याने टीका करत आले आहेत. "मला वाटते स्पेनची भूमिका सर्वांना माहित आहे; ती अत्यंत स्पष्ट आहे," असे रोब्लेस म्हणाल्या. तसेच इराणमधील युद्ध हे 'पूर्णपणे बेकायदेशीर आणि पूर्णपणे अन्याय्य' असल्याचेही रोब्लेस म्हणाल्या.

# कारखान्याच्या निवडणुका पुढे ढकलल्या

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील विधानसभा पोट निवडणुकांमुळे सहकार विभागाने अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका ३१ मेपर्यंत पुढे ढकलल्या आहेत. सहकार विभागाने आज, सोमवारी याबाबत आदेश जारी केला. सध्या सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर ३१ मेपर्यंत पुढे ढलण्यात आल्या आहेत. मात्र सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका यातून वगळल्या आहेत. या आदेशामुळे अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती बँकेसह ज्ञानेश्वर, मुळा आणि वृध्देश्वर या तीन साखर कारखान्यांच्या निवडणुकाही पुढे ढकलल्या गेल्या आहेत. बारामती व राहुरी या मतदारसंघातील अनुक्रमे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे आमदार शिवाजी कर्डीले यांच्या निधनामुळे भारत निवडणूक आयोगाने तेथे २३ एप्रिलला पोटनिवडणुकीसाठी मतदान जाहीर केले आहे. त्यासाठी प्रशासन आणि पोलीस यंत्रणा व्यस्त राहणार आहे. परिणामी सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळ, पोलीस बंदोबस्त, मतदान केंद्रांची उपलब्धता होण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे आदेशात नमूद केले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक भागांना गारपिटीचा फटका

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील अनेक भागांना वादळी वाऱ्यासह झालेला जोरदार पाऊस व गारपिटीचा पुन्हा एकदा फटका बसला. त्यामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार गेल्या तीन दिवसात अहिल्यानगर, अकोले व संगमनेर तालुक्यातील १२ गावांमधील २७०३ शेतकऱ्यांच्या ११०४ हेक्टर क्षेत्रातील शेती पिकांचे नुकसान झाले आहे.

हवामान विभागाने आज, सोमवारी व उद्या, मंगळवारी विजांच्या कडकडाटासह वादळ व गारपीटीची शक्यता व्यक्त करत 'ऑरेंज अलर्ट' जारी केला होता तसेच १ व २ एप्रिललाही 'यलो अलर्ट' जाहीर केला आहे. दरम्यान काल, रविवारी व आज जिल्ह्यात काही ठिकाणी गारपीट व जोरदार पाऊस झाला. दहा दिवसांपूर्वीच जिल्ह्यात गारपीट व वादळी पावसाचा १०३ गावांना फटका बसला होता. त्यावेळी १३ हजारांवर शेतकऱ्यांचे ८ हजार ९१ हेक्टर क्षेत्रातील शेती पिकांचे नुकसान झाल्याचे अहवाल कृषी विभागाने तयार केला होता. संगमनेरमधील धांदरफळ, निमज, डेरेवाडी, गोडसेवाडी, राजापूर या गावांना गारपीटीचा फटका बसला. गहू, कांदा, टोमॅटो, मका, डाळिंब पिकांचे मोठे नुकसान झाले. डेरेवाडी येथे संजय साबळे



यांच्या घरावरील पत्रे वादळाने उडाली. या घटनेत आदिती संजय साबळे जखमी झाल्या, त्यांच्यावर लोणी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. साठेनगर येथील भास्कर आल्हाट यांच्याही घरावरील पत्रे उडाली. वर्षा भीमराव गोर्डे यांचे घर कोसळून नुकसान झाले.

निमज येथील महानुभव पंथाच्या आश्रमावरील पत्रेही उडाली. आज सकाळी आमदार अमोल खताळ तसेच माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून नागरिकांना दिलासा दिला. सरकारने तातडीने पंचनामे करून सर्व नुकसानग्रस्तांना भरीव मदत करावी, अशी मागणी थोरात यांनी केली.

अकोल्याच्या पूर्व भागातही गारांचा पाऊस पडला. अकोले शहरात दुपारपासूनच विजेचा लपंडाव सुरू होता, त्याचाही फटका व्यापाऱ्यांना बसला. दुपारनंतर वातावरण बदलले व पावसास सुरुवात झाली. सायंकाळी मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस झाला.






## अकोलेसह नगर जिल्ह्यात गारांचा तडाखा; कांदा-गहू-टोमॅटो पिकांचे मोठे नुकसान, पंचनाम्याची मागणी!

# अवकाळी पावसाचा कहर



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर जिल्ह्यासह अकोले शहर व ग्रामीण भागात गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पावसाने जोरदार मुसंडी मारत गारांचा तडाखा दिल्याने शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काढणीच्या अवस्थेत असलेली कांदा, गहू, टोमॅटो तसेच भाजीपाला पिके पावसामुळे भिजली असून अनेक ठिकाणी सडण्याच्या मार्गावर आहेत. अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे बळीराजाची मोठी धावपळ उडाली असून आर्थिक संकट अधिकच गडद झाले आहे.

मार्च महिन्याच्या अखेरीस शेतकरी वर्ग पीक काढणी, साठवण व बाजारात विक्रीची तयारी करत होता. अनेक ठिकाणी कांदा शेतातून काढून मळ्यात व साठवण जागी ठेवण्यात आला होता. मात्र दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे हा कांदा पूर्णपणे भिजला आहे. गव्हाच्या शेतात पाणी साचल्याने कणसे आडवी झाली असून उत्पादन घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. टोमॅटो, भाजीपाला तसेच इतर पिकांवर गारांचा थेट तडाखा बसल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

नगर जिल्ह्यातील सुमारे १४ तालुक्यांमध्ये या पावसाची नोंद झाली आहे. अकोले व संगमनेर सह पठार भागात गारांचा पाऊस पडल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक गावांमध्ये वीजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची भीती वाढली आहे. काही ठिकाणी जोरदार वाऱ्यासह पाऊस झाल्याने उभ्या पिकांचेही नुकसान झाले आहे. दरम्यान, वर्षअखेरीचा कालावधी सुरू असल्याने अनेक ठिकाणी विकासकामे सुरू आहेत. अचानक आलेल्या पावसामुळे काही ग्रामीण रस्ते वाहून गेले असून अनेक ठिकाणी खड्ड्यांमध्ये पाणी साचले आहे. गावांदरम्यानची वाहतूक विस्कळीत झाली असून शेतमाल बाजारात नेण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. या पावसामुळे पायाभूत सुविधांचेही नुकसान झाल्याचे चित्र आहे.

दुसरीकडे, शासनाने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा केल्याने अनेक शेतकरी सोसायटी व बँकांकडे कर्ज भरण्यासाठी गर्दी करत होते. शेतकरी कर्जफेडीसाठी वणवण करत असतानाच अचानक पावसाने हजेरी लावल्याने शेतातील पिके वाचवण्यासाठी धावपळ उडाली. अनेक बँकांमध्ये सर्व्हर डाऊन होत असल्याने व्यवहारात अडचणी निर्माण झाल्याची तक्रारही शेतकरी करत आहेत.

पतसंस्था व विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांकडून वसुलीसाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. मात्र पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना कर्जफेड करणे कठीण झाले आहे. यापूर्वी कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ न मिळाल्याची चर्चा असून कर्जमाफीच्या निर्णयामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. सचिव व संचालक मंडळालाही वसुली करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे समोर येत आहे.

कोरोनानंतर सतत संकटांचा सामना करणाऱ्या बळीराजावर आता अवकाळी पावसाचे नवे संकट कोसळले आहे. वाढते उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार, कर्जफेडीचा ताण, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि आता अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान अशा दुहेरी-तिहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. अनेक गावांमध्ये पाण्याची कमतरता असताना अचानक आलेल्या पावसाने काही तास गारवा निर्माण केला असला तरी शेतकऱ्यांचे मात्र मोठे नुकसान झाले आहे.

ग्रामपंचायतींकडून पाणीपट्टी व घरपट्टी वसुलीसाठी तगादा लावला जात असताना शेतकरी वर्ग आर्थिक अडचणीत आहे. ठेकेदार व अधिकारी वर्षअखेरीची कामे पूर्ण करण्याच्या घाईत असताना दुसरीकडे बळीराजाचे नुकसान वाढत आहे. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने अनेक शेतकरी चिंतेत असून शेती करणे दिवसेंदिवस महाग होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त भागात तातडीने पंचनामे करावेत, शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत द्यावी, पीकविमा कंपन्यांनी भरपाई जाहीर करावी, तसेच कर्जफेडीस मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. अवकाळी पावसाने काही तासांत वातावरणात गारवा निर्माण केला असला तरी बळीराजाचे स्वप्न उद्ध्वस्त झाले असून शासनाने तातडीने दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

## डॉ. विश्वासराव आरोटे यांना “द ग्रेट इंडिया जर्नलिझम आयकॉन अवॉर्ड”

**(समर्थ गांवकरी)**




महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस, दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक तसेच अनेक पत्रकारांचे मार्गदर्शक व आधारस्तंभ असलेले मा. डॉ. विश्वासराव आरोटे साहेब यांना “द ग्रेट इंडिया जर्नलिझम आयकॉन अवॉर्ड” प्रदान करण्यात आला आहे. पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्य, समाजहिताची बांधिलकी आणि निर्भीड लेखनशैली यांची दखल घेत हा मानाचा पुरस्कार त्यांना बहाल करण्यात आला. डॉ. विश्वासराव आरोटे यांनी ग्रामीण भागातील प्रश्नांना वाचा फोडत सर्वसामान्यांच्या समस्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. पत्रकारिता क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य, युवा पत्रकारांना दिलेले मार्गदर्शन आणि सामाजिक जाणीव जपणारी भूमिका यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या पुरस्काराबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार बांधव यांच्याकडून डॉ. विश्वासराव आरोटे साहेब यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त केला जात असून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत. “द ग्रेट इंडिया जर्नलिझम आयकॉन अवॉर्ड” प्राप्त झाल्याबद्दल डॉ. विश्वासराव आरोटे साहेब यांचे सर्व स्तरातून मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन!

## पारायण सोहळयास प्रारंभ

**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील जागृत असलेल्या श्री क्षेत्र बहिरवाडी येथील श्री कालभैरवनाथांच्या यात्रेनिमित्त आयोजित त्रिदिनात्मक पारायण व नामसप्ताह सोहळयास सोमवार दि.३० मार्च पासून भक्तिमय वातावरणात प्रारंभ करण्यात आला.बुधवारी दि.१ एप्रिल रोजी श्री कालभैरवनाथांची मुख्य यात्रा आहे. श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा व वैकुंठवाशी हभप नासिकेत महाराज कोरेकर यांच्या कृपा आशिर्वादाने व राष्ट्र संत देवगड गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व ग्रामस्थ मंडळींच्या सहकार्याने हा यात्रा सोहळा साजरा होत आहे. त्रिदिनात्मक पारायण सोहळयाच्या शुभारंभ श्री कालभैरवनाथांच्या मूर्तीसह प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलनाने करण्यात आला.

## कोतुळ परिसरात अवकाळी पाऊस व गारपिटीचा तडाखा

### काढणीतील पिकांचे मोठे नुकसान, मदतीची मागणी!

**कोतुळ : (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील कोतुळ परिसरात सोमवारी सायंकाळी अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावत गारपिटीचा तडाखा दिल्याने शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. काढणीला आलेली कांदा, गहू, मका तसेच कोथिंबीर यांसारखी पिके पावसामुळे भिजली असून अनेक ठिकाणी गारांच्या मारामुळे पिके आडवी झाली आहेत. अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकरी वर्गाची मोठी धावपळ उडाली.

सध्या परिसरात गव्हाची सोंगणी सुरू होती, तर कांद्याची काढणीही वेगात सुरू होती. अनेक शेतकरी मळ्यात कांदा सुकवण्यासाठी टाकत असतानाच अचानक पाऊस सुरू झाल्याने दाणादाण उडाली. गारपिटीमुळे उभ्या पिकांचे नुकसान झाले असून काढलेला कांदा भिजल्याने साठवणुकीचा प्रश्न निर्माण झाला आहे. मका व भाजीपाला पिकांनाही या पावसाचा फटका बसला आहे.

आधीच शेतीमालाला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. त्यातच काढणीच्या तोंडावर आलेल्या या अवकाळी पावसाने तोंडाशी आलेला घास हिरावून घेतल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. पिके बाजारात विक्रीसाठी तयार असतानाच झालेल्या पावसामुळे शेतमाल मातीमोल होण्याची भीती निर्माण झाली आहे. काही ठिकाणी गारांचा जोरदार मारा झाल्याने गव्हाची कणसे तुटली असून कोथिंबीर व इतर भाजीपाला पिके पूर्णपणे जमिनीवर आडवी झाली आहेत. पावसामुळे शेतात पाणी साचल्याने पिके सडण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून नुकसानाचे प्रमाण मोठे असल्याचे सांगितले जात आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, तसेच पीकविमा योजनेंतर्गत भरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. कृषिभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी सयाजीराव पोखरकर यांनीही प्रशासनाने तातडीने परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे. अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे कोतुळ परिसरातील शेतकरी पुन्हा संकटात सापडला असून शासनाच्या मदतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## ३१ मार्चपूर्वी कर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी

### ५० हजार अनुदानासाठी सहकारी संस्थांकडे धाव!

**ब्राम्हणवाडा: (समर्थ गांवकरी)**

शासनाकडून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देण्यात येणार असल्याची घोषणा झाल्यानंतर ब्राम्हणवाडा येथील अहमदनगर डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बँक तसेच विविध कार्यकारी सहकारी सोसायटीमध्ये शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी शासनाने ३१ मार्चपूर्वी कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे अनुदानाचा लाभ मिळवण्यासाठी शेतकरी मोठ्या संख्येने बँक व सहकारी संस्थांकडे धाव घेत आहेत. पीक कर्ज नियमित करण्यासाठी शेतकरी सकाळपासूनच रांगेत उभे राहत असून कर्जफेड करण्यासाठी मोठी लगबग सुरू आहे. सहकारी सोसायटी तसेच बँक प्रशासनाकडूनही शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक ती व्यवस्था करण्यात येत आहे.

३१ मार्चची मुदत जवळ आल्याने पुढील दोन दिवसांत गर्दीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी वेळेत कर्ज भरून शासनाच्या ५० हजार रुपयांच्या अनुदान योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संबंधित संस्थांकडून करण्यात येत आहे.

## विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप प्रदान

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

एक्साइड इंडस्ट्रिस लिमिटेड यांच्या सामाजिक दायित्व (CSR) उपक्रमांतर्गत ‘ एक्साईड दिक्षा स्कॉलरशिप' योजनेंतर्गत समर्थ आय.टी.आय,बेल्हे येथील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. या उपक्रमांतर्गत इलेक्ट्रिशियन व फिटर या ट्रेडमधील एकूण १२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून प्रत्येक विद्यार्थ्याला रु.४५,००० इतकी शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यास तसेच कौशल्य विकासासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. इलेक्ट्रिशियन ट्रेडमधून साहिल शिवाजी पावडे,साहिल सुरेश पावडे,आयुष अमित जाधव,गणेश बाबा आदक,सोहम अशोक शिंगाडे,विनोद तुकाराम जाधव,साहिल सूर्यकांत घोलप व कुणाल सचिन गाडगे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

## मेजर भरत सखाराम घोलप यांना उत्कृष्ट सेवा पदक

- रोहोकडी गावाचा अभिमान उंचावला!

**ओतूर : (समर्थ गांवकरी)**



आपल्या कर्तृत्व, प्रामाणिक सेवा आणि कर्तव्यदक्षतेच्या जोरावर गावाचा नावलौकिक उंचावणाऱ्या रोहोकडी (ता. जुन्नर) येथील मेजर भरत सखाराम घोलप यांना भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडून “उत्कृष्ट सेवा पदक” प्रदान करण्यात आले. हा मानाचा सन्मान उप महानिरीक्षक महोदय यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. गृह मंत्रालयाकडून दिले जाणारे “उत्कृष्ट सेवा पदक” हे अत्यंत प्रतिष्ठेचे मानांकन मानले जाते. देशाच्या सुरक्षिततेसाठी, उत्कृष्ट कार्यपद्धतीसाठी आणि उल्लेखनीय सेवेसाठी हा पुरस्कार निवडक अधिकाऱ्यांना प्रदान केला जातो. मेजर घोलप यांनी आपल्या सेवाकाळात जबाबदारीने आणि निष्ठेने काम करत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. कठीण परिस्थितीतही धैर्य, शौर्य आणि संयम राखत त्यांनी कर्तव्य पार पाडले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय सेवेमुळेच त्यांची निवड या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी करण्यात आली. हा सन्मान केवळ मेजर घोलप यांच्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण रोहोकडी गावासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. त्यांच्या या यशाची बातमी कळताच रोहोकडी गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. गावकऱ्यांनी अभिमान व्यक्त करत त्यांच्या कर्तृत्वाचे कौतुक केले. अनेकांनी सोशल मीडियावर तसेच दूरध्वनीद्वारे त्यांना शुभेच्छांचा वर्षाव केला. त्यांच्या कुटुंबीयांनाही या यशाचा मोठा आनंद झाला असून, त्यांच्या मेहनतीचे फळ मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. ग्रामीण भागातून पुढे येत जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर मोठे यश मिळवणे ही प्रेरणादायी बाब ठरली आहे. त्यांच्या या कार्यातून त्यांनी तरुणांसमोर आदर्श निर्माण केला असून, त्यांच्या यशामुळे अनेक युवकांना प्रेरणा मिळणार आहे.

## भव्य अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचे ब्राम्हणवाडा येथे आयोजन!



**ब्राम्हणवाडा: (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथे “ब्राम्हणवाडा चषक २०२६” अंतर्गत भव्य अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे हे १२ वे वर्ष असून सोमवार दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ब्राम्हणवाडा (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथे स्पर्धेला उत्साहात सुरुवात झाली. आज या स्पर्धेचे उद्‌घाटन उपसरपंच सुभाष गायकर, ग्रामपंचायत सदस्य रवींद्र हांडे, शिवाजी आरोटे तसेच उद्योजक दिपक गायकर यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फित कापून स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

स्पर्धेसाठी प्रवेश फी ११०० रुपये ठेवण्यात आली असून परिसरातील क्रिकेट संघांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. विजेत्या व उपविजेत्या संघांसाठी आकर्षक रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली असून खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## दलालीला चाप आणि मिळणार योजनांचा थेट लाभ : संजय मोरे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



शिवसेना ही ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या ब्रीदवाक्यावर चालणारा पक्ष आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या जनहितार्थ योजनांचा लाभ तळागाळातील गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी हा कक्ष मोलाची भूमिका बजावेल असा ठाम विश्वास शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांनी आज सोमवार दि ३० रोजी शेवगाव येथे बोलताना व्यक्त केला. जिल्हा परिषदेच्या माजी सभापती सौ.हर्षदाताई काकडे व ॲड शिवाजीराव काकडे यांच्या पुढाकाराने शेवगाव येथे 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहायता कक्ष ' व जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन शिवसेनेचे सचिव मोरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवसेनेचे प्रवक्ते संजीव भोर, जिल्हाध्यक्ष बाबुशेठ टायरवाले, प्रवीण घुले, संदेश कार्ले, रामदास भोर, दीपक जंजिरे, अंकुश चितळे, अरुण मुंढे, तालुका अध्यक्ष आशुतोष डहाळे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख साईनाथ आधाट, दिलीप भागवत, एकनाथ कुसळकर, रणजित परदेशी, बाळासाहेब मडके,राज भुसे,रामजी पोटफोडे,लक्ष्मण गवळी, रोहित काथवटे,संजय देशपांडे आदींसह असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना ॲड. काकडे म्हणाले की, तालुक्यात आजवर तीन-तीन राष्ट्रीय पक्ष, बडे कारखानदार आणि अनेक आजी-माजी आमदार असतानाही सामान्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत. त्यांच्याविरुद्ध लढण्यासाठी आम्हाला शिवसेनेच्या रूपाने एक मोठी शक्ती मिळाली आहे.

ताजनापूर टप्पा दोनचे अपूर्ण काम पूर्ण करून लाभार्थी गावांतील बंधारे पाण्याने भरून देणे, तालुक्यातील बोधेगाव, सुकळी सारख्या दुष्काळी पट्ट्याला पाणी मिळवून देणे आणि तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) उभारणी करणे हा आमचा मुख्य अजेंडा असुन त्याची पूर्तता करण्यासाठी पाठपुरावा करण्याची मागणी यावेळी केली.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. हर्षदाताई काकडे यांनी तर सुत्रसंचालन भाऊसाहेब सातपुते यांनी केले. दरम्यान, या नवीन सहायता केंद्रामुळे आता शेवगावच्या नागरिकांना दलालांचे उंबरठे झिजवण्याऐवजी एकाच छताखाली सर्व मदत मिळणार असल्याने समाधान व्यक्त होत आहे. काकडे घराणे नेहमीच जनतेच्या पाण्यासाठी रस्त्यावर उतरून झगडत आले आहे.

त्यांच्या या कार्याची दखल घेऊन शेवगावचा पाणी प्रश्न आणि एम आय डि सी (MIDC)बाबत संबंधित मंत्र्यांसमवेत विशेष बैठक लावून हा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन श्री. मोरे यांनी दिले. अवघ्या दोन दिवसांत ५४ शाखा उघडणे, हे मागील ३० वर्षांपासून कार्यकर्त्यांशी जपलेल्या घट्ट नात्याचे प्रतीक असल्याचे स्पष्ट करत तालुक्यात नव्याने शेकटे बुद्रुक, बाडगव्हाण, शेकटे खुर्द, गोळेगाव, बेलगाव, शोभानगर, सोनोशी, शिंगोरी, बोधेगाव, दहिफळ आणि नवीन दहिफळ या गावात मिळून एकूण ११ नवीन शाखा उघडण्याची घोषणा सौ.काकडें नी केली.

# नेवासा लहुजी वॉरियर्सने मारली बाजी

## गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांकडून टीमचे स्वागत



**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर येथील सामाजिक कार्यकर्ते लहूभाऊ खंडागळे यांच्या वतीने आयोजित मातंग समाज प्रीमियर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेमध्ये नेवासा येथील लहुजी वॉरियर्सने दणदणीत विजय संपादन करून चषकासह प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली.विजेत्या टीमचे देवगड परिसरात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांनी सदरची विजेती टीम दर्शनासाठी आली असता देवगड येथे टीमचे स्वागत केले. नेवासा येथील टीम 'लहुजी वॉरियर्स नेवासा' या संघाने प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल देवगड येथे गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांनी टीमचे कौतुक करत शुभाशीर्वाद देऊन सन्मान केला. टीमचे संघ मालक देवगड येथील सोमनाथ ताकवणे यांच्यासह संघाचे कर्णधार गटसाहेब काळोखे,खेळाडू अमोल कणगरे,अरुण ताकवले,लक्ष्मण सकट,महेश आव्हाड,नितीन ससाणे आकाश जगधने,महेश खंडागळे,राहुल मिसाळ,लखन मिसाळ,सनी ताकवणे निखिल ताकवणे,गणेश ताकवणे,शाम नन्नवरे,हिटलर काळोखे यांचे अभिनंदन केले. देवगड फाटा येथे झालेल्या सत्कार समारंभ कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे आयोजक किशोर ताकवणे,कालिका प्रतिष्ठानचे अध्यक्ष सचिन केंदळे,रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ साठे,नितीन जाधव,बाळासाहेब ताकवणे,अक्षय राजगुरू,राहुल पंडित, एकनाथ मिसाळ, संदीप ताकवणे, संजय खंडागळे,तेजस केंदळे,स्वप्निल केंदळें,अजय केंदळें,रोहन ताकवणे,बाळू जाधव,संभाजी आढागळे यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी व क्रिकेट प्रेमींनी फटाक्यांची आतषबाजी करत व तोफांची सलामी देत विजेत्या टीमच्या यशाबद्दल शुभेच्छा देत अभिनंदन करून जल्लोषात स्वागत केले. सर्व यशस्वी खेळाडू व ग्रामीण भागात राहून काबाडकष्ट करून क्रिकेट खेळाला वेळ देत सराव करत होते.श्रीरामपूर येथे झालेल्या टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेत या सर्व खेळाडूंनी जिद्द व चिकाटीने क्रिकेट खेळून हे यश संपादन केले.क्रिकेट सारख्या जगविख्यात असलेल्या या खेळात ग्रामीण भागातील खेळाडू ही कमी नाही हे लहुजी वॉरियर्स या टीमने जोरदार खेळाचे प्रदर्शन करत सिद्ध केले.अशा गुणवान खेळाडूंना प्रोत्साहित करण्यासाठी शासनाने देखील त्यांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी अपेक्षा अनेकांनी आपल्या भाषणातून बोलतांना व्यक्त केली.

# उघड्या खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका

## नागरिकांकडून तातडीने कारवाईची मागणी!

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

पावणे एमआयडीसी परिसरातील सेंट्रल रोडवर हायको बस स्टॉपजवळ सुरू असलेल्या पाईपलाईन कामामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गटरजवळ मोठा खड्डा निर्माण झाल्याने येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनचालकांना गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी या खड्ड्याचा अंदाज न आल्यामुळे एका कारचा अपघात झाला होता. सुदैवाने जीवितहानी टळली, मात्र वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.



धक्कादायक बाब म्हणजे हा खड्डा अद्याप उघडाच असून कोणतीही सुरक्षिततेची उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दैनिक समर्थ गावकरी मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांनी संबंधित ठेकेदाराला अनेक वेळा फोनद्वारे याची माहिती दिली असतानाही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचे सांगितले जाते.

या पार्श्वभूमीवर “एखादी मोठी दुर्घटना झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?”, “जीवितहानी झाल्यास जबाबदार कोण?” असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप होत असून प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करावी तसेच त्या ठिकाणी सुरक्षिततेची उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# वनपरिक्षेत्र अधिकारी शितल नगराळे यांचा राज्य शासनाच्या रजत पदकाने सन्मान!

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र वनसेवेत उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पाल येथील वन्यजीव वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती शितल नगराळे यांना राज्य शासनाच्या वतीने प्रतिष्ठेचे रजत पदक प्रदान करण्यात आले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



श्रीमती नगराळे यांनी आपल्या कार्यकाळात वनसंवर्धन, वन्यजीव संरक्षण तसेच अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवल्या आहेत. पाल वनपरिक्षेत्रात अवैध डिंक संकलन, बेकायदेशीर लाकूडतोड आणि वनक्षेत्रातील अतिक्रमणाविरोधात त्यांनी कठोर कारवाई करत वनसंपत्तीचे संरक्षण केले. त्यांच्या नेतृत्वाखाली वनविभागाच्या पथकाने विविध ठिकाणी छापे टाकून अनेक गुन्हे उघडकीस आणले. यासोबतच स्थानिक ग्रामस्थांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले. वृक्षारोपण मोहिमा, शालेय विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण जनजागृती कार्यक्रम तसेच वन्यजीव संरक्षणाबाबत मार्गदर्शन यामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे वनविभाग व नागरिक यांच्यातील समन्वय अधिक बळकट झाला आहे.

त्यांच्या प्रामाणिक, कर्तव्यदक्ष व धाडसी कार्यशैलीमुळे त्यांना हा मानाचा सन्मान प्राप्त झाला असून स्थानिक नागरिक, सामाजिक संघटना व शासकीय अधिकाऱ्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले आहे. भविष्यातही वनसंपत्तीचे संरक्षण व पर्यावरण संतुलन राखण्यासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार श्रीमती नगराळे यांनी व्यक्त केला आहे.

# शिव महापुराण कथा व ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट तालुक्यातील मौजे कमठाला येथे यावर्षी अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. गावातील समस्त ग्रामस्थांच्या पुढाकारातून आणि मार्गदर्शनाखाली हा सप्ताह आयोजित करण्यात आला असून, अखिल मानवजातीस विश्वात्मक शांती लाभावी तसेच प्रत्येक प्राणीमात्राला सुख, शांती व समाधान मिळावे, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ६ या वेळेत काकडा भजन, सकाळी ७ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० वाजता साधा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ८ ते १२ या वेळेत शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

# शहरात श्रीराम व गरुड रथाची मिरवणूक उत्साहात साजरी

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

श्रीराम आणि गरुड रथोत्सव चैत्र महिन्यातील कामदा एकादशी निमित्त काढण्यात येतो. हा रथोत्सवास काल रविवारी (दि. २९) सायंकाळी ५ वाजता काळाराम मंदिराच्या पूर्व दरवाजापासून प्रारंभ झाला. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर यंदा भाविकांची मोठी गर्दी झाली होती.



मानकरी पुजाऱ्यांच्या हस्ते मंदिरात पूजा करून पालखीतून भोगमूर्ती श्रीराम रथात विराजमान करण्यात आल्या. या मूर्तींना रामकुंड येथे परंपरेनुसार अवभृत स्नान घालण्यात आले. काळाराम मंदिरात यंदाचे मानकरी वंशपरंपरागत पूजाधिकारी नरेंद्रबुवा पुजारी यांच्या हस्ते मूर्तींची पूजा करण्यात आली. आरती करून मूर्ती श्रीराम रथात स्थापित करण्यात आल्या. यावेळी रामरथ आणि गरुडरथ दोन्ही समांतर उभे करण्यात आले. आरतीनंतर गरुडरथ पुढे रवाना झाला. या रथाच्या पुढे सनई-चौघडा होता. मस्तकावर छत्री धारण केलेले मानकरी परंपरेनुसार रथाकडे तोंड करून उलट्या दिशेने मार्गक्रमण झाले. यावेळी महापौर हिमगौरी आडके आहेर, उपमहापौर विलास शिंदे स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप आमदार सीमा हिरे आमदार राहुल ढिकले, देवयानी फरांदे,माजी आमदार बाळासाहेब सानप , भाजप नेते लक्ष्मण सावजी, डॉ विलास पांगरकर, रामसिंग बावरी, सुनील आडके , बाळासाहेब पाठक आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते. गरुडरथाची जबाबदारी श्री काळाराम संस्थानकडे असून, हा रथ ओढण्याचा मान अहिल्याराम व्यायामशाळेकडे आहे. रामरथ ओढण्याचा मान रास्ते आखाडा तालीम संघ आणि पाथरवट समाज यांच्याकडे आहे. दोन्ही रथ काळाराम मंदिराच्या पूर्व दरवाजापासून निघाले . नागचौक, चरणपादुका चौक, लक्ष्मण झुला पूल, जुना आडगाव नाका, गणेशवाडी, गौरी पटांगण, गाडगे महाराज पुलाखालून रामरथ म्हसोबा पटांगणावर थांबला. तर गरुडरथ गौरी पटांगणावरून रोकडोबा मैदान, पिंपळपार, धुमाळ पॉइंट, मेनरोड, बोहरपट्टी, सरकारवाडा, सराफ बाजार, भांडी बाजार, कपूरथळा, म्हसोबा पटांगण, सांडव्याच्या देवीसमोरून गंगाघाट मार्गे व्यायामशाळेकडे आला. त्यानंतर चांदवडकर गल्ली, अहिल्याराम व्यायामशाळा, रामकुंड येथे दोन्ही रथ एकत्र आले. म्हसोबा पटांगणावर थांबलेला रामरथ गरुडरथाच्या मागे रामकुंडावर नेण्यात आला. या ठिकाणी अवभृत स्नान झाल्यानंतर परशुराम पुरीया रोड, मालवीय चौक, शनिचौक, हनुमान चौक मार्गे रथांचा परतीचा प्रवास काळाराम मंदिराच्या पूर्व दरवाजापर्यंत नेण्यात आला. यावेळी भाविकांनी ठिकठिकाणी रथाचे पूजन करून दर्शन घेतले.

# मराठवाड्याचा दुष्काळी कलंक पुसणार : एकनाथ शिंदे

**लोहा : (समर्थ गांवकरी)**

लोहा येथिल बैल बाजार मैदानावर आयोजित भव्य शेतकरी अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी मराठवाड्याचा ‘दुष्काळी’ हा कलंक पुसण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी शेतकरी नेते व माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांनी शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. त्यांचे स्वागत करताना शिंदे म्हणाले, “शेतकऱ्यांसाठी रक्ताचं पाणी करणारा कार्यकर्ता म्हणजे ‘शेतकऱ्यांचा महादेव’ आहे,” अशा शब्दांत त्यांनी धोंडगे यांचे कौतुक केले आहे.



या अधिवेशनाला खासदार ज्योती वाघमारे, आ हेमंत पाटील, आनंद बोंढारकर, बालाजी कल्याणकर, बाबुराव कदम, जिल्हाप्रमुख विनय गिरडे, विवेक देशमुख, उमेश मुंडे, माजी आ सुधाकर भालेराव, विशाल कदम, आनंद बरोसे, बाळासाहेब देशमुख, शिवराज धोंडगे, दिलीप धोंडगे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.शिंदे यांनी संबोधीत करताना सांगितले की, मराठवाड्याच्या विकासासाठी अडीच वर्षांत ४.२९ लाख कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मराठवाडा वॉटर ग्रीडसारख्या योजना प्रत्यक्षात राबवून पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. “मी स्वतः शेतकऱ्याचा मुलगा असून आजही कार्यकर्ता म्हणूनच काम करतो,” असे त्यांनी नमूद केले आहे.

सरकारच्या शेतकरी हिताच्या योजनांचा आढावा घेताना त्यांनी नमो शेतकरी योजनेअंतर्गत वार्षिक १२ हजार रुपयांची मदत, १ रुपयात पीक विमा, ‘लाडकी बहीण’ योजना तसेच दोन लाखांपर्यंत कर्जमाफीचा शब्द पूर्ण करण्याचा पुनरुच्चार केला.“काही जण निवडणुकांपुरतेच शेतकऱ्यांचे नाव घेतात, मात्र आम्ही शेतमालाला योग्य भाव देण्यासाठी कटिबद्ध आहोत,” असेही त्यांनी स्पष्ट केले. ‘गाव तिथे शाखा’ या संकल्पनेप्रमाणे आता गावागावात ‘शेतकरी शाखा’ उभ्या करण्याचे आवाहन त्यांनी केले. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा उल्लेख करत “काम करणारा कार्यकर्ताच खरा राजा होतो,” असे त्यांनी सांगितले.राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना माजी आ शंकर अण्णा धोंडगे यांनी नांगर भेट देत शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले. त्यांच्या या पक्षप्रवेशामुळे मराठवाड्यातील ग्रामीण राजकारणात नवी समीकरणे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शेतकरी अधिवेशनात अनेक कार्यकर्त्यांनी विविध पक्षांमधून शिवसेनेत पक्ष प्रवेश करत भगवा झेंडा खांद्यावर घेतला. यावेळी ‘गाव तिथे शाखा’ उभी करण्याचा संकल्प करण्यात आला असून, ग्रामीण भागात संघटन मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

# १२ तलवारी जप्त

**नारायणगाव : (समर्थ गांवकरी)**

पुणे ग्रामीण जिल्ह्याच्या हद्दीमध्ये बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या इसमांना अटक करून कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद शिरसागर यांच्या सूचनेनुसार रविवार दि.२९ रोजी स्थानिक गुन्हे शाखा जुन्नर विभागाचे पथक नारायणगाव पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना सहा.फौजदार दीपक साबळे यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की सालीम साजिद पठाण (वय २० राहणार शिपाई मोहल्ला,जुन्नर) हा त्याच्या ताब्यातील सुझुकी कंपनीची एस्टीम गाडी MH 12 DE 2767 घेऊन नारायणगाव येथे येणार असून त्या गाडीत तलवारी आहेत. मिळालेल्या बातमीवरून गुन्हे शाखा पथक पथक तसेच नारायणगाव पोलीस स्टेशन कडील पथकाने सदर ठिकाणी पंचा समक्ष जाऊन संशयित इसमास ताब्यात घेऊन त्याला त्याचे नाव पत्ता विचारले आणि त्याचे नाव सालीम साजिद पठाण राहणार शिपाई मोहल्ला जुन्नर असे सांगितले.

## श्री क्षेत्र पिंपळगाव नाकविंदा येथे भक्तीमय वातावरणात

# अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

श्री विठ्ठल मंदीर देवस्थान ट्रस्ट आयोजीत परिसरातील सर्व भाविकांच्या सहकार्याने तसेच ह.भ.प. वै.तुकाराम महाराज सदगीर व ह.भ.प.पांडूरंग महाराज मुखेकर यांच्या कृपाशिर्वादाने अकोले तालुक्यातील श्री क्षेत्र पिंपळगाव नाकविंदा येथे मोठया जल्लोशात तसेच भक्तीमय वातावरणात अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता करण्यात आली. या दरम्यान काकडा आरती, गाथा भजन,विचारांचे भजन, हरिपाठ, हरीकिर्तन व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठया भक्तीभावाने परिसरातील भावीक भक्त विठ्ठल नामाच्या जयघोषात तल्लीन झालेले पाहायला मिळाले होते. शेवटच्या दिवशी सकाळी पायी दिंडी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या दिंडी सोहळ्यात ग्रामस्थांबरोबरच शालेय विद्यार्थी देखील सहभागी झाले होते. माऊली, तुकोबाचा जयघोष करत टाळ, मृदुंग,शालेय विद्यार्थी लेझीम नृत्यावर ठेका धरत भक्तीरसात तल्लीन झाले होते. संपुर्ण परिसर हरिनामान दुमदुमला होता. ह.भ.प. राजेंद्र महाराज सदगीर ( मुथाळणे ) यांचे काल्याचे किर्तन होऊन नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला. समस्त ग्रामस्थ पिंपळगाव नाकविंदा, आढळवाडी, सोंगाळवाडी, श्री विठ्ठल देवस्थान ट्रस्ट आदींनी अखंड हरिनाम सप्ताहाचे उत्कृष्ट नियोजन केले होते.



# ॲड. उमेश चिकने यांचा गांवकरी समूहाच्या वतीने सन्मान!



**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

कोपरखैराणे विभागात पारदर्शक कामकाज करत सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे मुंबई हायकोर्टाचे ॲडव्होकेट उमेश चिकने यांचा दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सन्मान करण्यात आला.यावेळी त्यांना दैनिक समर्थ गांवकरी दैनंदिनी, दिनदर्शिका व किचन भेट देऊन गौरविण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या ॲड. उमेश चिकने यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान त्यांच्या कार्याचे उपस्थितांनी कौतुक केले.

या वेळी दैनिक समर्थ गांवकरी मुंबई विभागीय संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दशरथ चव्हाण यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

# पिर फाटा-बदगी-म्हसवंडी दहा किमी रस्ता पूर्णत्वाच्या मार्गावर

- पठार भागातील नागरिकांना मोठा दिलासा, प्रवास होणार सुलभ!
- सचिन नरवडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे रस्ता मंजूर
- आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या प्रयत्नातून पठार भागाला दिलासा!



**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील पिर फाटा ते बदगी-म्हसवंडी या मार्गावरील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुमारे दहा किलोमीटर रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून या रस्त्यामुळे पठार भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या या मार्गाचे काम सुरू झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. या रस्त्याचे काम मंजूर होण्यासाठी अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरणजी लहामटे यांच्या प्रयत्नांना तसेच राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस सचिन नरवडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला महत्त्वाचे श्रेय दिले जात आहे. या रस्त्यासाठी जवळपास सात कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मागील दीड वर्षांपासून या रस्त्याचे काम सुरू असून बहुतांश काम पूर्ण झाले आहे. काही ठिकाणी किरकोळ काम शिल्लक असून विशेषतः म्हसवंडी कडे जाणाऱ्या मार्गावरील काम पूर्ण करणे बाकी आहे. हे कामही लवकरच पूर्णत्वास जाईल, अशी माहिती युवक कार्यकर्ते सचिन नरवडे यांनी दिली.

या रस्त्यामुळे ब्राम्हणवाडा, बदगी, म्हसवंडी, काळेवाडी, खामुंडी तसेच परिसरातील अनेक गावांना थेट जोडणी मिळणार आहे. ब्राम्हणवाडा-काळेवाडी-खामुंडी असा शॉर्टकट मार्ग उपलब्ध होणार असल्याने वाहनधारकांचा वेळ वाचणार आहे. तसेच टोल टाळता येणार असल्याने नागरिकांच्या खर्चात बचत होणार आहे. कमी अंतरामुळे इंधन बचत होऊन प्रवास अधिक सुलभ व सुखकर होणार असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.म्हसवंडी मार्गे पुढे हा रस्ता पिंपरीकडे जोडला जात असल्याने परिसरातील नागरिकांसाठी हा मार्ग अधिक उपयुक्त ठरणार आहे. शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी तसेच रोजंदारी कामगारांना या रस्त्याचा मोठा फायदा होणार असून वाहतूक सुलभ होणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका तसेच इतर वाहने वेळेत पोहोचण्यास मदत होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

बदगी ते काळेवाडी हा रस्ता गेल्या २० ते २२ वर्षांपासून झालेला नव्हता. त्यामुळे पावसाळ्यात या भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. चिखल, खड्डे आणि खराब रस्त्यामुळे वाहतूक ठप्प होत असे. शालेय विद्यार्थी, शेतकरी तसेच गावकऱ्यांना मोठ्या त्रासाचा सामना करावा लागत होता. अनेक वेळा या रस्त्याबाबत मागण्या करण्यात आल्या होत्या, मात्र काम होत नव्हते.

स्थानिक नागरिकांच्या मते, यापूर्वी कोणत्याही आमदारांनी या पठार भागाकडे विशेष लक्ष दिले नव्हते. त्यामुळे या भागातील विकास कामे रखडली होती. मात्र आमदार डॉ. किरणजी लहामटे निवडून आल्यानंतर या भागातील रस्ते, पाणी व इतर विकासकामांना गती मिळाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, राजूर-ब्राम्हणवाडा-बोटा हा महत्त्वाचा रस्ता देखील मंजूर झाला असून लवकरच या रस्त्याचे काम सुरू होणार असल्याची माहिती युवक कार्यकर्ते सचिन नरवडे यांनी दिली. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पठार भागातील वाहतूक व्यवस्था अधिक मजबूत होणार असून नागरिकांच्या दळणवळणाला मोठी चालना मिळणार आहे.

# भगवान श्री परशुराम जन्मोत्सव कार्यक्रम पत्रिकेचा शुभारंभ

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

श्री परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने दि १६ ते १९ एप्रिल रोजी १२ व्या भगवान श्री परशुराम जन्मोत्सव व अक्षय्य तृतीयेनिमित्त भव्य श्री परशुराम याग व विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले आहे. श्री विशाल गणपतीचे महंत योगी संगमनाथजी गुरू गेंडानाथजी महाराज यांच्या हस्ते श्री विशाल गणपतीला कार्यक्रमाची पत्रिका अर्पण करून शुभारंभ करण्यात आला. प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, ह. भ. प. प्रभाताई भोंग, डॉ. सतीश फाटके, डॉ. सौं. अंजली फाटके, यशवंत आंबेकर ,अरुण अवटी, चेतन वसगडेकर, सुरेश क्षीरसागर , नरेश व्यास, प्रमोद कुलकर्णी, अनिरुद्ध भऊरकर, अनंत कुलकर्णी , शिरीष देशपांडे, दत्तात्रय देशपांडे, उदय जोशी, श्रीया देशमुख, दीपाली उदास,सौं. कांचन तांबोळी,चि देवांग कुलकर्णी, चि सार्थक भोंग, चि अथर्व देशपांडे, कौस्तुभ देशमुख, प्रशांत भालेराव, सुनील बोपर्डीकर , विजय देशपांडे,अतुल शुक्ल, कैलास शिंदे,चि. अर्णव देशपांडे ,चि. भार्गव देशपांडे, चि. वेदांत कुलकर्णी, चि. देवांश कुलकर्णी, चि. आरोह भऊरकर, चि. रोहीत तांबोळी, नरेंद्र श्रोत्री, अमित डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. गुरुवार दि. १६ एप्रिल स. १० ते दु. २ सावेडी रोडवरील प्रकाश नेत्रालयात नेत्ररोग तपासणी शिबीर व नेत्रदान शिबीरात डॉ. राजीव चिटगोपेकर हे तपासणी करणार आहेत. यावेळी सर्व ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष उपस्थित राहणार आहे. शुक्रवार दि. १७ एप्रिल स. १० ते दु. २ नालेगावातील जनकल्याण रक्त केंद्रात कै. शशिकांत यशवंत गटणे यांच्या स्मृती प्रित्यर्थ रक्तदान शिबीर शनिवार दि. १८ एप्रिल स. ७ ते दु. २ चितळे रोडवरील ऋग्वेद भवनात भव्य श्री परशुराम याग प्रधान आचार्य वे.शा. सं.श्री. सिध्देश्वर निसळ यांच्या उपस्थितीत प्रमुख यजमान भगवान देशमुख व सौ. माधुरी देशमुख , संजय देशमुख व सौ. अंजली देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. दुपारी महाप्रसाद आयोजन केले आहे. रविवार दि. १९ एप्रिल भव्य पायी शोभायात्रा सायं. ४.३० ते ६.३० रेणुकामाता मंदिर (प्रोफेसर कॉलनी चौक) ते भिस्तबाग चौक, सावेडी भगवान श्री परशुराम जन्मोत्सवाची सांगता होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष समर्थभक्त मंदारबुवा रामदासी असून आमदार संग्राम जगताप, आमदार गोपीचंद पडळकर हे उपस्थित राहणार आहेत. भगवान परशुराम जन्मोत्सवाचे प्रवचन ह.भ.प. कुं. रेणुकाताई निसळ यांचे होणार असून महाआरती सांगता होईल. अशी माहीती संयोजन समिती दिली आहे.



## थोडक्यात बातम्या...




### जडाबाई दुगड शिक्षण संकुल येथे संगणक कक्ष आणि ग्रंथालयचे उद्घाटन


पुणे **(स. गांवकरी)** : पुण्यातील सुखसागर परिसरात गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी उभारण्यात आलेल्या जडाबाई दुगड शिक्षण संकुल येथे संगणक कक्ष आणि ग्रंथालय चे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. लेडीज सर्कल इंडिया यांच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती शीशम सबरवाल आणि क्षेत्र अध्यक्षा श्रीमती मेघा राठी यांच्या हस्ते या अत्याधुनिक लॅबचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गौरव दुगड आणि मोनल दुगड उपस्थित होते. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका नंदा राजाराम भोसले, पुणे कॉस्मोपोलिटन राऊंड टेबल 110 चे अध्यक्ष अश्विन संघवी, पुणे कॉस्मोपोलिटन लेडीज सर्कल 81 च्या अध्यक्षा सुमन पोरवाल, सचिव वीनीता खाटर, कोषाध्यक्ष विनिता ओसवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना संस्थेच्या सचिव मोनल दुगड यांनी सांगितले की, "सुमारे 40 वर्षांपूर्वी गोरगरीब मुलांसाठी सुरू केलेली ही शाळा आज मोठ्या प्रमाणात विकसित झाली आहे. येथे सेमी-इंग्लिश माध्यम सुरू करण्यात आले असून कमी शुल्कात दर्जेदार शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आता लायब्ररी आणि संगणक लॅबची भर घालण्यात आली आहे." ही संस्था कै माणिकचंद नारायणदास दुगड यांनी सुरू केली असून सध्या प्रमोद माणिकचंद दुगड हे चेअरमन म्हणून कार्यरत आहेत. तर गौरव दुगड उपाध्यक्ष आणि मोनल दुगड सचिव पदावर कार्यरत आहेत.संस्थेच्या माध्यमातून सुखसागर परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.

### पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धा २ ते ६ एप्रिल दरम्यान




नांदेड जिल्हा **(स. गांवकरी)** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे दिनांक २ ते ६ एप्रिल २०२६ या कालावधीत पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो (मुले) स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा बाद व साखळी पद्धतीने खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ना इंद्रनील नाईक यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. मनोहर चासकर राहणार आहेत. यावेळी आंतरराष्ट्रीय खेळाडू व भारतीय खो-खो संघाचे कर्णधार प्रतीक वाईकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य, सिनेट सदस्य, अभ्यास मंडळाचे सदस्य तसेच कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्र, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश व राजस्थान या पाच राज्यांतील एकूण ७४ संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेसाठी विद्यापीठ परिसरात चार क्रीडांगणांची निर्मिती करण्यात आली असून, सामने दिवस व प्रकाशझोतात खेळविण्यात येणार आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून, सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. ही स्पर्धा खेळाडूंना आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

### भगवान महावीर स्वामींच्या २६२५व्या जन्मकल्याणकानिमित्त भव्य उत्सव




पुणे **(स. गांवकरी)** : पुण्यातील तुळशीबाग–मंडई परिसर जैन संघाच्या वतीने भगवान महावीर स्वामींच्या २६२५व्या जन्मकल्याणकानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा प्रभूंच्या दर्शनी मूर्तीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याने उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या निमित्ताने भगवान महावीर स्वामींची आकर्षक व दर्शनीय मूर्ती तयार करून ती दिवसभर मंडई परिसरात दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. जैन समाजाबरोबरच इतर नागरिकांनाही प्रभूंचे दर्शन घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सायंकाळी प्रभूंची भव्य महाआरती आयोजित करण्यात येणार असून "कौन बनेगा भाग्यशाली" या लकी ड्रॉचेही आयोजन करण्यात आले आहे. तसेच लक्ष्मी रोडवरून दिमाखदार वरघोडा काढण्यात येणार असून, मागील २५ वर्षांपासून पुणे सकल संघाच्या वरघोड्यात या मंडळाचा बक्षीसपात्र सहभाग राहिला आहे. उत्सवाबाबत माहिती देताना मोहन साखरिया यांनी सांगितले की, तुळशीबाग–मंडई परिसर जैन संघाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून प्रभूंच्या दर्शनी मूर्तीला यंदा २५ वर्षे पूर्ण होत आहेत. हा उत्सव जैन समाजाच्या श्रद्धा आणि एकात्मतेचे प्रतीक असून अधिकाधिक भक्तांनी उपस्थित राहून दर्शन, आरती व वरघोड्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

## प्रकाश राठोड यांना 'राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान' जाहीर

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठित 'राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान २०२६' पारनेर तालुक्यातील पळशी ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच मा. श्री. प्रकाश बबन राठोड यांना जाहीर झाला आहे. ग्रामीण विकासातील उल्लेखनीय कामगिरी आणि समाजहितासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. येत्या रविवार, ५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, सावेडी रोडवरील माऊली संकुल सभागृह, अहिल्यानगर येथे हा भव्य राज्यस्तरीय सन्मान सोहळा संपन्न होणार आहे. 'मान कर्तृत्वाचा.. सन्मान नेतृत्वाचा' या ब्रीदवाक्याखाली आयोजित या कार्यक्रमात राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित राहणार आहेत. हा पुरस्कार सोहळा सरपंच सेवा संघाचे मार्गदर्शक बाबासाहेब पावसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, ग्रामसेवक नेते एकनाथराव ढाकणे, तसेच रोहित पवार आणि यादवराव पावसे पाटील यांसारख्या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

**कामाची पोचपावती**

प्रकाश राठोड यांनी सरपंच म्हणून पळशी गावामध्ये राबवलेले विविध विकास प्रकल्प, प्रशासकीय पारदर्शकता आणि जनसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी घेतलेले परिश्रम यामुळे त्यांची ही निवड सार्थ ठरली असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. सरपंच सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष रोहित पवार यांनी या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

हा पुरस्कार केवळ माझा सन्मान नसून, पळशी ग्रामपंचायतीच्या प्रत्येक सदस्याचा आणि ग्रामस्थांचा माझ्यावर असलेल्या विश्वासाचा विजय आहे. 'स्वराज्य सरपंच सेवा संघा'ने माझ्या कार्याची दखल घेतली, याचा मला सार्थ अभिमान आहे. आदर्श गाव घडवण्याचे आमचे ध्येय असून, यापुढील काळातही लोकसहभागातून पळशीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्यासाठी मी कटीबद्ध राहीन. **- प्रकाश राठोड (सरपंच, पळशी)**

आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर झाल्यानंतर नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी सरपंच प्रकाश राठोड यांचे अभिनंदन केले आहे.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी पळशी ग्रामस्थ आणि मित्रपरिवाराने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक विस्तारीकरणाला गती



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मंगळवार पेठेतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या विस्तारीकरणाचा प्रश्न लवकर सोडवण्यासाठी महापालिका प्रशासन सक्रिय झाले आहे. राज्य सरकारच्या रस्ते विकास महामंडळाच्या मालकीची जागा पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करून त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिष्ठेला साजेसं भव्य स्मारक उभारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. रिपब्लिकन पक्षाचे नेते व पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली. यावेळी बाळासाहेब जानराव, राहुल डंबाळे, महिपाल वाघमारे, उमेश कांबळे, जयदेव रंधवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## नारायणगाव येथे बेकायदा तलवारी बाळगणाऱ्यास अटक !




**नारायणगाव : (समर्थ गांवकरी)**

पुणे ग्रामीण जिल्ह्याच्या हद्दीमध्ये बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारांना अटक करून कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी नुकत्याच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखा, जुन्नर विभागाचे पथक नारायणगाव हद्दीत पेट्रोलिंग करत असताना सहा. फौजदार दीपक साबळे यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की सालीम साजिद पठाण (वय २०) राहणार शिपाई मोहल्ला,जुन्नर हा सुझुकी एस्टीम गाडी MH 12 DE 2767 घेऊन नारायणगाव येथे येणार असून त्याच्या गाडीत बेकायदा तलवारी आहेत. मिळालेल्या गुप्त माहितीवरून गुन्हे शाखा व नारायणगाव पोलीस स्टेशनच्या पथकाने सदर ठिकाणी पंचासमक्ष जाऊन संशयित इसमास ताब्यात घेतले असता त्याने त्याचे नाव सालीम साजिद पठाण राहणार शिपाई मोहल्ला, जुन्नर असे सांगितले.त्याच्या गाडीची पंचासमक्ष झडती घेतली असता गाडीमध्ये दहा मोठ्या तलवारी तसेच दोन लहान तलवारी मिळून आल्या.पंचासमक्ष गाडी तसेच बारा तलवारी जप्त केल्या असून सदर बाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अंमलदार अक्षय नवले यांनी नारायणगाव पोस्टे येथे फिर्याद दिली असून त्यावरून नारायणगाव पोस्टे ६०/२०२६ भारतीय शस्त्र अधिनियम १५५९ ४,५(२५) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते विकासकामांचा शुभारंभ

- कौठा येथे २४×७ पाणी पुरवठा तर स्वच्छता ताफ्यात नवीन वाहने दाखल आणि ७४ ऑनलाईन सेवांचा प्रारंभ

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**




नांदेड शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आणि नागरिकांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आज नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेच्या विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टी-शिवसेना महायुतीची सत्ता आल्यानंतर महापौरांनी १०० दिवसांचा कृती आराखडा प्रसिध्द केला होता त्या आराखड्याची पहिली वचनपूर्ती सोमवार दि ३० मार्च रोजी करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण* यांच्या शुभहस्ते या विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. "नांदेडला स्मार्ट सिटीच्या दिशेने नेण्यासाठी पाणी, स्वच्छता आणि डिजिटल सेवा या त्रिसूत्रीवर आम्ही भर देत आहोत," असे मत खासदार अशोकराव चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केले.

खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते कौठा भागातील रवि नगर येथे २४×७ पाणी पुरवठा योजनेचा प्रायोगिक तत्त्वावर (Pilot Project) शुभारंभ करण्यात आला. या योजनेमुळे आता या परिसरातील नागरिकांना चोवीस तास आणि पुरेशा दाबाने पाणी उपलब्ध होणार आहे. *"शहरातील प्रत्येक घराला शुद्ध आणि निरंतर पाणी मिळावे, हे आमचे उद्दिष्ट आहे," असे प्रतिपादन यावेळी चव्हाण यांनी केले. केंद्र शासन पुरुस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत या योजनेचे काम हाती घेण्यात आले असुन कौठा भागात २ कि.मी. जलवाहीणी नव्याने टाकुन एकुण १४१४ मालमत्ता धारकांना Ultraasonic Water AMR Meter बसवुन २४×७ पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. या यशस्वी प्रयोगानंतर ही योजना टप्प्याटप्प्याने संपूर्ण शहरात राबवली जाणार आहे.

तसेच शहराच्या स्वच्छतेसाठी महानगरपालिका मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात खासदार चव्हाण यांच्या हस्ते नवीन अत्याधुनिक स्वच्छता वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी महानगरपालिकेच्या ताफ्यात नवीन अत्याधुनिक स्वच्छता वाहने समाविष्ट करण्यात आली आहेत. यामध्ये स्वच्छता विभगासाठी दोन स्विपींग मशीन व मलनिस्सारण विभागासाठी एका वाहनाचा समावेश असून त्यात जेटींग, गल्फर व रिसायक्लींगचा समोवश असणार आहे, या अत्याधुनिक मशिनचा व्हॅक्यूम क्लीनरव्दारे मुख्य रस्त्यावरील स्वच्छता जलद गतीने होण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे जेटींग कम सक्शन मशीन वाहनामुळे मॅन होल व ड्रेनेज लाईनची स्वच्छता तातडीने होण्यास मदत होणार आहे.

त्याचप्रमाणे प्रशासनात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम' (RTS) अंतर्गत महापालिकेच्या ७४ सेवा आता पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. या सेवांच्या संनियंत्रणासाठी तयार करण्यात आलेल्या 'अविरत कक्षा' चे उद्घाटनही खासदारांच्या हस्ते करण्यात आले.

## काल्याचा प्रसाद फुगीर लोकांना दिला जात नाही : विकासानंद महाराज मिसाळ

**श्रीक्षेत्र पाडळी दर्या: (समर्थ गांवकरी)**




अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप हा काल्याच्या किर्तनाने होतो व या काल्याचा प्रसाद हा फुगीर लोकांना दिला जात नाही , त्यासाठी वैष्णव असावे लागते , अशा वैष्णवां च काल्याचा प्रसाद दिला जातो , असे परखड मत कृष्ण कृपांकित संत पंढरीचे निर्माते हभप डॉ . विकासानंद महाराज मिसाळ यांनी व्यक्त केले .

श्रीराम नवमी व ग्रामदैवत श्री भैरवनाथ , जोगेश्वरी माता यात्रोत्सवानिमित १४ अखंड हरिनाम सप्ताह किर्तन महोत्सवात काल्याचे हरी किर्तन कृष्ण कृपांकित डॉ . विकासानंद महाराज मिसाळ म्हणाले की , जिथे दोन गोष्टी एकत्र आल्या की , काला होतो , या काल्याचा प्रसाद हा एकाने खायचा नसतो , तर सर्वांनी मिळून खाल्ला पाहिजे . लोकांनी प्रपंच करून परमार्थ करतात . पण परमार्थात प्रपंच करू नये . माणसाकडे संपत्ती असावे , पण दातृत्व ही असावे , नाही तर त्यावर नागासारखे बसावे , याला काही अर्थ नाही . चांगल्या व्यवहारातून धन प्राप्त करावे . या संपूर्ण जगाचे निर्मिती परमात्याने केली , त्याला ही काही कारणे आहेत . ईश्वर या जगाला निर्मित करणारे कारण आहे . विठ्ठल व्यापक असल्याने सर्वत्र चराचरात भरलेला आहे . फक्त हा परमात्मा पाहण्याची वृत्ती हवी आहे . अंतकरण्याच्या प्रकाशाला वृत्ती म्हणतात . वृत्ती तयार करण्यासाठी तत्वचिंतन करावे लागेल , ग्रंथ पाहावे लागेल , जिज्ञासा लागेल . वेद हा सर्वांत श्रेष्ठ आहे . वेदाच्या मार्गाने गेला तर परमात्मा भेटेल . परमात्म्या ला जाणून घेण्यासाठी भक्तीचे माप तयार केले आहे . त्यात भक्तीत भाव असावा लागतो . या भावानेच देव प्राप्त होतो . वर वर परमार्थ करणारे खूप आहेत , पण अंतमुर्ख होऊन परमार्थ करणे महत्वाचे आहे . सर्वांमध्ये देव पाहिला , तर भांडणे होणार नाही , न्यायालया ला कामचं राहणार नाही . राम , श्रीकृष्ण हे पुर्ण अवतार आहेत . धाकट्या भावाचे कर्तृत्व आहे की , मोठ्या भावाची सेवा करावी . श्री कृष्ण सर्वांगाने सुंदर असू पुर्णतम अवतार व सच्चिदानंद आहे . जगाचे दुःख घालवणारा देव आहे , त्याच्या शिवाय कोणी नाही . श्रीकृष्ण सर्वांना आकृष्ठ करतो , तर त्याचे नाव वासुदेव ही आहे , कारण सर्वांना सामावून घेतो . जो सर्व ठिकाणी श्रेष्ठ तो च सर्वांचा मुकुटमणी असतो , असा हा श्रीकृष्ण होय . त्यांनी सर्वांना आपुलसे केले . देवांमध्ये २ नाचणारे देव आहेत , एक नटनटेश्वर भगवान महादेव , तर दुसरा नटेश्वर श्रीकृष्ण होय . मी पणाला कोण खातय , एक क्षेत्र सोडले तर दुसरीकडे तुम्हाला कोण विचारतंय , अशी ओळख तयार करण्यापेक्षा कृष्णमय व्हावे . दही व भात एकत्र केले की , ते कशानेही वगळे होत नाही, तोच काला होय . काला कोणी ही खाऊ शकत नाही . ज्यांची अवस्था श्रीकृष्ण मय चित्त झाली आहे . देवा वाचून कोणा च्या वर ही प्रेम नाही , तो खरा वैष्णव होय . किर्तन म्हणजे रेडीमेड कपडयाचे दुकान आहे , ज्याला त्याला त्याच्या मापात बसते.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# फुले दांपत्य स्मारक समितीला मंडळांनी दिला पाठिंबा

■ लवकरच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले पूर्णाकृती पुतळा उभारण्याचे काम पूर्ण होऊन भव्य दिव्य स्मारक होईल- किशोर डागवाले

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचे भूमिपूजन होऊन आठ महिने झाले तरीदेखील प्रत्यक्ष कामाची सुरुवात झाली नाही.माळीवाडा परिसरातील अतिक्रमणे व माळीवाडा वेशी त स्मारकासाठी जागा अपुरी पडत असल्याने स्मारकाचे काम पूर्ण होऊ शकत नाही.हे फुले प्रेमींच्या लक्षात आल्याने फुले प्रेमींनी शहरातील गणेश मंडळे,विविध समाजाचे पदाधिकारी,सामाजिक संघटना व नगरसेवक यांच्या भेटीगाठी घेऊन स्मारक होणे किती महत्त्वाचे आहे. हे निदर्शनात आणून दिल्यानंतर शहरातील ६२ नगरसेवकांनी फुले दाम्पत स्मारक समितीला मोठा पाठिंबा देत महानगरपालिकेचे महापौर तसेच उपमहापौर यांना निवेदन देऊन माळीवाडा वेश पाडण्यासाठी महानगरपालिकेत



विशेष सभा घेण्याची मागणी केली आहे. या सर्व नगरसेवकांचे अभिनंदन करतो.तसेच माळीवाडा परिसरातील दहा गणेश मंडळांनी पाठिंबा दिला आहे.याबरोबरच सकल मराठा समाज,सकल कैकाडी समाज, पद्मशाली समाज,साळी समाज, कासार समाज अशा अनेक समाज बांधवांचा मोठा पाठिंबा मिळत असल्याने लवकरच महानगरपालिकेच्या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले पूर्णाकृती पुतळा उभारण्याचे काम पूर्ण होऊन भव्य दिव्य स्मारक होईल.असे प्रतिपादन महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीचे किशोर डागवाले यांनी सांगितले आहे. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या स्मारक होण्यासाठी तसेच परिसरातील अतिक्रमणे हटविणे व माळीवाडा वेस पाडावी.यासाठी फुले दांपत्य स्मारक समितीला माळीवाडा परिसरातील तरुण मंडळांनी पाठिंबा पत्र दिले आहे. यावेळी स्मारक समितीचे किशोर डागवाले,बाळासाहेब भुजबळ, विनोद पुंड, अमोल भांबरकर, राजेंद्र पडोळे,श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा.माणिक विधाते, पंडितराव खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, छगुनाना जाधव,बजरंग भुतारे, विष्णुपंत म्हस्के,संग्राम रासकर, अशोक आगरकर, राजेंद्र ताठे, प्रकाश इवळे,भास्कर चौधरी, सुरेश कावळे,जालिंदर बोरुडे, सुधीर पुंड, गणेश कोल्हे, मच्छिंद्र बनकर बाबासाहेब दळवी,माळी महासंघाचे मनोज फुलसौंदर, दिनेश कापरे, नंदकुमार नेमाने, गणेश धाडगे, अमोल रासकर, रोहित पठारे, मळु गाडळकर, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे महानगर अध्यक्ष ब्रिजेश ताठे, फुले ब्रिगेडचे अध्यक्ष दिपक खेडकर,रोहन डागवाले,अनिल घाडगे,सतीश रासने,ज्ञानदेव खराडे,सुहास पाथरकर, शशिकांत पवार,मयूर मैड आदींसह महात्मा फुले प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा.माणिक विधाते म्हणाले, पूर्वी माळीवाडा वेश ही शहराचे प्रवेशद्वार म्हणून ओळखली जात होती.परंतु आता काळाच्या ओघात ती वेस जीर्ण होऊन पडझड झाली आहे.तसेच गाव ही संकल्पना बदलून नगरचे महानगर झाले आहे. स्मारक भव्य दिव्य होण्यासाठी माळीवाडा वेस पाडणे आवश्यक आहे.हे लक्षात घेऊन शहरातील नगरसेवकांनी मोठा पाठिंबा दिला आहे.ही अभिमानास्पद बाब आहे.

बजरंग भुतारे म्हणाले,महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीने उत्तम प्रकारे नियोजन केल्याने नियोजीत स्मारकाचे अडचणी दूर होतील. महात्मा फुले ही सर्व समाजाचे दैवत आहे.महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पूर्ण कृती पुतळा व्हावा. यासाठी

माळीवाडा वेस पाडण्यासाठी माळीवाडा परिसरातील नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे.तसेच माळीवाडा तरुण मंडळ व सावता माळी उत्सव कमिटीच्या वतीने पाठिंबा देत आहे.माळीवाडा वेस पाडण्यासाठी चार नगरसेवक विरोध करीत आहेत.माळीवाडा परिसरातील अतिक्रमणांकडे त्यांचे लक्ष नाही का?वेशी भोवती असलेल्या अतिक्रमणांमुळे महात्मा फुले यांचा पुतळा देखील झाकला जात आहे.अशी खंत भुतारे यांनी व्यक्त केली आहे.

पंडित खरपुडे म्हणाले, महात्मा फुले ही सर्व समाजाचे दैवत आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सर्वांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली आहेत.त्यांचे स्मारक भव्य दिव्य असे असावे.माळीवाडा परिसरातील पाचही रस्त्यावरून हे स्मारक दिसावे.असे झाल्यास माळीवाडा परिसराचे चित्र पालटेल. अहिल्यानगर जिल्ह्यातील महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पूर्ण कृती पुतळा प्रथमच होत असल्याने सर्व महात्मा फुले प्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. माळीवाडा तसेच शहराच्या वैभवात मोठी भर पडणार आहे. यावेळी फुले प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बाळासाहेब भुजबळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# अहिल्यानगर शहरात रिक्षा चालकांचा मोर्चा



**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने एलपीजी 'गो गॅस'च्या वाढत्या दरांविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून तीव्र निषेध नोंदवण्यात आला. शहरात एलपीजी गॅसचे दर दुप्पटपेक्षा जास्त वाढवून सुमारे १०० रुपयांपर्यंत नेण्यात आल्याने रिक्षा चालकांचे आर्थिक कंबरडे मोडले असून, युद्धपूर्वीचा ४२ रुपये ५० पैसे प्रति लिटर दर तात्काळ लागू करावा, अशी मागणी करण्यात आली. संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे की, फेब्रुवारी २०२६ पूर्वी एलपीजी 'गो गॅस'चा दर ४२.५० रुपये प्रति लिटर होता. मात्र इराण-अमेरिका संघर्षानंतर दररोज दरवाढ होत जाऊन आज ते शंभरी पार गेले आहेत. केंद्र व राज्य सरकार दरवाढ होणार नसल्याचे सांगत असताना गॅस कंपन्या कोणाच्या आदेशाने दरवाढ करत आहेत, असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला. रिक्षा चालकांचा आरोप आहे की, गॅस दरवाढीसोबतच गॅस भरण्यातही हेराफेरी होत असून, अपेक्षित मायलेज मिळत नाही. त्यामुळे एकीकडे जास्त दर आणि दुसरीकडे कमी अवरेज अशा दुहेरी फटक्यामुळे चालकांना व्यवसाय करणे कठीण झाले आहे. दिवसभर मेहनत करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या रिक्षा चालकांच्या उपजीविकेवर याचा गंभीर परिणाम होत आहे. सरकारने तेल व गॅस कंपन्यांवर नियंत्रण ठेवून दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, तसेच वाहनधारकांची होणारी आर्थिक लूट थांबवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. याशिवाय रिक्षा चालकांसाठी प्रभावी आणि स्वावलंबी कल्याणकारी मंडळ स्थापन करून त्यासाठी ठोस कायदेशीर तरतुदी कराव्यात, अशीही मागणी संघटनेने केली. राज्य शासनाने रिक्षा-टॅक्सी कल्याणकारी मंडळाची घोषणा केली असली, तरी त्यासाठी आवश्यक नियम व निधीची तरतूद अद्याप केलेली नाही. तसेच सभासद नोंदणीसाठी सक्ती केली जात असल्याचा आरोप करून ही सक्ती तात्काळ थांबवावी, अशी मागणीही करण्यात आली.

# मॉन्ट्रा इलेक्ट्रिकचा महाराष्ट्रात विस्तार

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

वैविध्यपूर्ण मुरुगप्पा समूहाची क्लीन मोबिलिटी शाखा असलेल्या मॉन्ट्रा इलेक्ट्रिकने पुण्यात आपल्या पहिल्या इलेक्ट्रिक ट्रॅक्टर (ई-२७) डीलरशिपच्या उद्‌घाटनाने प्रवेश केला आहे. जागतिक भू-राजकीय परिस्थितीमुळे पारंपरिक इंधन पुरवठा साखळी आणि किंमतींबाबत अनिश्चितता निर्माण होत असताना हे पाऊल उचलण्यात आले आहे. कृषी क्षेत्रासाठी डिझेल हा मुख्य घटक राहिला आहे. त्यामुळे मॉन्ट्रा इलेक्ट्रिकचा ई-२७ हे एक शाश्वत आणि व्यवहार्य पर्याय म्हणून काम करतो. तो खर्चावर नियंत्रण देऊन इंधनावर अवलंबून राहण्याचे प्रमाण कमी करू शकतो. कृषी आणि औद्योगिक अशा एकत्रित मागणीमुळे तो पुणे प्रदेश बाजारपेठेत एक महत्त्वपूर्ण संधी सादर करणार आहे.

# साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी प्रा. डॉ. संदीप सांगळे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने मे २०२६ मध्ये होणाऱ्या १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी पुणे विद्यापीठाच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ.संदीप सांगळे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती शब्दगंध चे अध्यक्ष राजेंद्र उदागे व संस्थापक,सचिव सुनील गोसावी यांनी दिली. शब्दगंध साहित्यिक परिषदेची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच जाधव लॉन्स, अहिल्यानगर येथे कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.साहेबराव ढमढेरे आर्ट्स, कॉमर्स कॉलेज, तळेगाव ढमढेरे या ठिकाणी कार्यरत असलेले डॉ.संदीप सांगळे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष



असून त्यांचे एकूण बारा पुस्तके प्रकाशित आहेत.त्यामध्ये कथाकार शंकरराव खरात, मध्ययुगीन मराठी संत कविता:सामाजिक व वाड्मयीन मूल्यमापन, आधुनिक मराठी साहित्य:स्वरूप आकलन व आस्वाद,मराठी वाड्मय तंत्र:स्वरूप व आकलन,संत सोयराबाई:व्यक्तित्व व कर्तृत्व,रूप कवितेचे (संपादन), गीतमाला (संपादन), लोकाविष्कार (संपादन), यशोगाथा:एक परिक्रमा संपादन), व्यावहारिक उपयोजित मराठी आणि प्रसार माध्यमांची कार्यशैली अशी पुस्तके प्रकाशित आहेत.त्यांचे सहा महत्त्वाचे रिसर्च पेपर नॅशनल लेव्हलवर प्रसिद्ध झालेले आहेत.त्यांच्या मार्गदर्शनाखाली तेरा विद्यार्थ्यांनी पीएचडी तर १२ विद्यार्थ्यांनी १२ एमफिल केलेली आहे. प्रा.डॉ.संदीप सांगळे यांना राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषदेच्या वतीने गुणवंत शिक्षक पुरस्कार,पद्मगंगा पुरस्कार, सकाळ एक्सलन्स अवॉर्ड,मराठी अध्यापन व साहित्य सेवा कार्यगौरव पुरस्कार,अक्षर गौरव साहित्य पुरस्कार,डॉ. निर्मलकुमार फडकुले साहित्य पुरस्कार, उपक्रमशील शिक्षक पुरस्कार,राष्ट्रीय कार्यगौरव पुरस्कार,पद्मश्री पु.ल.देशपांडे मुक्तांगण आदर्श शिक्षक रत्न पुरस्कार,आद्य क्रांतिकारक गुरु लहुजी वस्ताद साळवे समाज सन्मान पुरस्कार यासह विविध साहित्यिक पुरस्कार मिळालेले आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषद कर्जत शाखा व ज्ञान प्रबोधिनी ग्रामविकास प्रतिष्ठान,पुणे चे अध्यक्ष आहेत.

विविध ठिकाणी आयोजित साहित्यिक उपक्रमामध्ये ते सातत्याने सहभागी असतात म्हणून त्यांची सतराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे,त्यांच्या निवडीबद्दल शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी,अध्यक्ष राजेंद्र उदागे,कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, सोळाव्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष,नगरसेवक संपतदादा बारस्कर,माजी संमेलनाध्यक्ष डॉ.संजय कळमकर,मा.आ.लहू कानडे, खजिनदार भगवान राऊत यांनी अभिनंदन केले आहे.

# 'भामट्यांनीच केली कापडाच्या रोलची हेराफेरी'

## अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आवळल्या आरोपींच्या मुसक्या...!

इसमांना ताब्यात घेवुन नमुद गुन्ह्यातील मुद्देमाला बाबत विश्वासात घेवुन विचारपुस करता वरील इसमाने सांगितले की, ४) संजय लिलाधर कुमार व ५) लिलु मिना उर्फ नंदलाल मिना यांनी अपहार केलेला मुद्देमाल हा मनोहारठाणा जि. झालवाड राजस्थान याठिकाणी लपवून ठेवले असल्याचे सांगितले. त्यानंतर सदर ठिकाणी जावुन खात्री केली असता. मिळुन आलेल्या इसमांकडुन 78,82,184/-रु कि.चे एकुण लहान मोठे ४७० कापडाचे रोल असा गुन्ह्यातील अपहार झालेला संपुर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमूद आरोपी आणि मुद्देमाल गुन्ह्याच्या पुढील तपासकामी कोतवाली पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले.

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

लाखो रुपये किंमतीच्या कापडाचे रोल बेंगलोरला घेऊन जाण्यासाठी मोठ्या विश्वासाने ज्यांच्याकडे सोपविण्यात आले, त्या भामट्यांनीच कापडाच्या या रोलची हेराफेरी केली.

अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी (एलसीबी) मोठ्या शिताफीने या भामट्यांचा पाठलाग करून राजस्थान मधून मुद्देमाल हस्तगत करत या गुन्ह्यातल्या भामट्यांच्या मुसक्या आवळल्या. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर एलसीबीचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी अमरिशकुमार ओमप्रकाश गुप्ता (वय-५७ वर्षे रा.



एफ 102 सालीन हाईट, नारोल लांभारोड, अहमदाबाद, राज्य गुजरात) यांनी अहिल्यानगरच्या कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. तक्रारदार गुप्ता यांच्या कंपनीतील कंटेनर गाडीवर (क्र-27. ज्र.5935) चालक म्हणून कामाला असलेल्या संजय लिलाधर कुमार आणि क्लिन्नर लिलु मिना उर्फ नंदलाल मिना यांनी संगनमत करुन फिर्यादीचे कंपनीचे एकुण ५५५ कापडाचे रोल बेंगलोर येथे घेवुन जाणे करीता विश्वासाने सोपवलेले असतांना आरोपींनी नमुद ४७० कापडाचे रोल बेंगलोर येथे न पोहचवता ते परस्पर स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता वापरले.

या कापडाच्या रोलची एकूण किंमत ७८ लाख ८२ हजार १८४/- रुपये इतकी आहे. फिर्यादीच्या कंपनीच्या मालाचा अपहार करुन कंपनीची व कंपनीच्या मालकाचा विश्वासघात करुन या दोघांनी आर्थिक अपहार केला आहे. सदर घटनेबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात गु. र. नं. 210/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 316 (4), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी पो.नि. किरणकुमार कबाडी, स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांना सदर गुन्ह्यातील आरोपीचे शोध घेवुन तात्काळ ताब्यात घेवुन त्यांचेकडुन मुद्देमाल हस्तगत करणे बाबत आदेशित केले. पोनि श्री किरणकुमार कबाडी यांनी सदर गुन्ह्यातील आरोपीचे शोध होणेकामी स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि/संदिप मुरकुटे, पोलीस अंमलदार, सुनिल पवार, रिचर्ड गायकवाड, फुरकान शेख, भगवान थोरात, प्रशांत राठोड, विशाल तनपुरे, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत, चालक उमाकांत गावडे अरुण मोरे यांचे पथक तयार करुन सदर पथकास गुन्ह्यातील आरोपीचे व मुद्देमालाचे शोध होणे कामी सुचना व मार्गदर्शन करुन सदरचे पथक रवाना करण्यात आले होते. या पथकाने गुन्हा ठिकाणी भेट देवुन, गुन्ह्यातील आरोपींची माहिती संकलित करुन आरोपींची माहिती काढत असतांना पथकास व्यवसायीक कौशल्य व गुप्त माहितीच्या आधारावर सदर गुन्ह्यातील आरोपींनी नवापुर जि. नंदुरबार या ठिकाणी वाहन उभे करुन त्यातील मुद्देमाल दुस-या वाहनात भरुन अपहार केलेबाबत माहिती या पथकाला मिळाली.

या पथकाने तात्काळ नवापुर येथे जावुन तेथुन सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले व गोपनिय माहिती प्राप्त केली. त्याठिकाणापासुन पथकाने कुठलाही विलंब नकरता तात्काळ जयपुर राजस्थान पर्यंत सलग चार दिवस सी.सी.टी.व्ही फुटेजची पाहणी केली व गुन्ह्यातील आरोपी नामे संजय लिलाधर कुमार व लिलु मिना उर्फ नंदलाल मिना यांचे शोध घेतला असता ते मिळुन आले नाही. त्यानंतर व्यवसायिक कौशल्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील मुद्देमाल हे इसम नामे मोहम्मद युनुस सलाउद्दीन (रा. तालछापर ता. सुजानगढ, जि. चुरु राजस्थान व त्याचे साथीदार यांचेकडे लपवुन ठेवले असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने राजस्थान येथे जावुन इसम मोहम्मद युनुस सलाउद्दीन (रा. तालछापर ता. सुजानगढ, जि. चुरु राजस्थान) याचे शोध घेतला असता इसम नामे 1) मोहम्मद युनुस सलाउद्दीन (वय-४९ वर्षे रा. तालछापर, ता.सुजानगढ, जि.चुरु राजस्थान), २) बाबुलाल जिवनराम जाट (वय-३२ वर्षे रा. रनधिसर ता.सुजानगढ, जि.चुरु राजस्थान), ३) मोहम्मद अमिर सज्जाद (वय -३३ वर्षे रा. चुडीमियाँ ता.लक्ष्मणगढ, जि.सिकर राजस्थान) हे मिळुन आले.

# रामनामाच्या गजरात भक्तीमय श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांच्या पावन जन्मोत्सवानिमित्त श्रीराम सेवा समितीच्या वतीने पुण्यात अत्यंत भक्तीमय, आध्यात्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात श्रीराम जन्मोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. 'श्रीराम जय राम जय जय राम' या अखंड नामस्मरणाने परिसर दुमदुमून गेला होता. रामभक्तीच्या या दिव्य सोहळ्यात शेकडो भाविकांनी उपस्थित राहून भक्तिरसाचा आनंद लुटला. अल्पबचत भवन येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात वैदिक मंत्रोच्चार आणि पारंपरिक विधींनी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते प्रभू श्रीरामांचे विधिवत पूजन करण्यात आले. ईश्वरचंद गोयल, जयभगवान गोयल, पवन बंसल, पवन चमडिया, गुंजन नवाल, नरेंद्र



गोयल, प्रेम मित्तल, सतीश अग्रवाल, योगेश जैन, पवन सराफ, आनंद अग्रवाल, राकेश अग्रवाल, रितेश अग्रवाल, गीता गोयल, रुची गोयल, राजेश मित्तल, सुनीता बंसल, नंदलाल पूरनचंद , द्वारका जालन यांच्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर हरियाणातील सुप्रसिद्ध भक्तीगीत गायिका प्रियंका चौधरी आणि गायक अरविंद अग्रवाल यांनी सादर केलेल्या सुमधुर भजनांनी संपूर्ण वातावरण भक्तीरसाने ओथंबून गेले.

# शैक्षणिक संकुलातर्फे २२ व्या स्मृतिदिनी आदरांजली अर्पण

## सत्ता ही सेवेसाठी असते, हे डॉ. नाथ पाऊलबुधे यांनी कार्यातून दाखविले - डॉ.मंदार कुलकर्णी

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

स्व. डॉ. नाथ पाऊलबुधे यांना कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा नसताना सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवनामध्ये नगर शहरासह जिल्ह्यात समाजपयोगी कार्य करून सत्ता ही सेवेसाठी असते हे मूल्य जोपासत सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याबरोबरच विडी कामगारांच्या वसाहतीचा प्रश्न, गोरगरीब मुला-मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवून आपल्या कार्यातून त्यांनी दाखविले. असे प्रतिपादन संस्थेचे संचालक डॉ. मंदार कुलकर्णी यांनी केले. वसंत टेकडी येथे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक स्व.माजी आमदार डॉ.नाथ पाऊलबुधे यांचा २२ वा स्मृतिदिन निमित्त



सर्व शैक्षणिक युनिटच्यावतीने आदरांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे संस्थेचे संचालक डॉ.मंदार कुलकर्णी, संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे सर्व युनिटचे प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक वृंद आदी उपस्थित होते. डॉ.कुलकर्णी म्हणाले,डॉ.नाथ साहेब व्यवसायाने डॉक्टर होते. पण एक माणुसकी धर्म म्हणून सेवा ते रुग्णांना देत असत. गोरगरिबां विषयी त्यांना खूप आस्था असायची, पैसे न घेता ते औषध उपचार करीत चरितार्थाचे साधन म्हणून डॉक्टरकीचा व्यवसाय त्यांनी केला नाही. विधान परिषदेवर एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून श्री. शरदचंद्र पवार यांनी नियुक्ती केली. ६ वर्षे आमदार असताना शहराचा विकास, विडी कामगारांचे प्रश्न, शैक्षणिक क्षेत्रातील समस्या यावर लक्ष केंद्रित करून सेवा शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून प्राथमिक, माध्यमिक, कॉलेज उभे केले. त्यामुळे आज परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची चांगली सोय उपलब्ध झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेचे सचिव रामकिसन देशमुख म्हणाले डॉ. नाथ साहेबांनी शैक्षणिक संकुलात लावलेले या छोट्या रोपट्याचे मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाले.आज येथे इंजिनिअरिंग, फार्मसी, डीएड, बीएड, आयुर्वेद महाविद्यालय सुरू झाल्याने त्यांच्या कार्याची हे संकुल एक प्रकारे साक्ष देत आहेत. आपल्या कामावर निष्ठा ठेवून अजून समाजात शिक्षणाचे महत्त्व देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ.पाऊलबुधे यांच्या शैक्षणिक सामाजिक आणि मानवतावादी कार्याचा गौरव आपल्या आदरांजली भाषणातून केला शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ.पाऊलबुधे यांचे मोठे योगदान आजही आम्हाला प्रेरणादायी ठरत असल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली.

# प्रिया बापट आणि उमेश कामत यांची मुख्य भूमिका असलेल्या 'हे काय नवीन?' चे विशेष स्ट्रिमिंग मराठी ZEE5वर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मराठी मनोरंजनाचे प्रमुख ठिकाण असलेल्या मराठी ZEE5 हृदयस्पर्शी आणि आपल्याशा वाटणाऱ्या कथाकथनाचे हक्काचे व्यासपीठ असून 'हे काय नवीन?' या नवीन ओरिजनल सिरीजचे आता स्ट्रिमिंग होणार असून त्यात एक आनंददायी वळणही आहे! या सिरीजमध्ये खऱ्या आयुष्यात एकमेकांचे जोडीदार असलेल्या उमेश कामतने आदित्य तर प्रिया बापट हिने रमाची भूमिका साकारली आहे. ही मालिका आकर्षण, आराम आणि प्रामाणिकपणाचा एक अतिरिक्त पदर उलगडते जो केवळ एक वास्तविक बंध निर्माण करू शकतो. कारण प्रामाणिकपणे सांगायचे तर -जीवनाचा शोध घेणाऱ्या विवाहित जोडप्याच्या



भूमिकेत आधीपासूनच असलेल्या या जोडप्यापेक्षा इतर कुणी या व्यक्तिरेखा अधिक चांगल्या साकारल्या असत्या?

वरुण नार्वेकर दिग्दर्शित, या सिरीजमध्ये आयुष्यातील मोठे टप्पे गाठल्यानंतर काय घडते यावर एक प्रेमळ, जीवनाच्या पैलूवरील भाष्य आहे. प्रिया बापट, उमेश कामत, शुभांगी गोखले, उदय टिकेकर, सुयोग गोऱ्हे, राजसी भावे, ओमकार गोवर्धन, तन्वी कुलकर्णी आणि पायल जाधव अशा उत्कृष्ट कलाकारांच्या टीमसह, ही सिरीज रमा आणि आदित्य यांचे चित्रण करते, ज्यांचे आयुष्य सुरळीत, पुरेसे नीट जगलेले आहेत. त्यांना आता प्रश्न पडला आहे, "ठीक आहे... आता काय?"

दैनंदिन जीवनाच्या पार्श्वभूमीवर हे काय नवीन? ही सिरीज अनेकदा दुर्लक्ष करत असलेल्या छोट्या छोट्या क्षणांमध्ये, मूक विरामांमध्ये, बदलत्या स्वप्नांमध्ये आणि दीर्घकालीन नातेसंबंधांमध्ये शिरकाव करणाऱ्या न बोललेल्या प्रश्नांमध्ये बुडून जाते. आपल्या दैनंदिन जीवनचक्रातून विसावा म्हणून रमा सबॅटिकल घ्यायचे ठरवते. स्वतःला क्रिएटिव्ह वेंचरमध्ये झोकून देते. छोटेखानी, स्वतः सुरू केलेली क्लोदिंग लाईन!

अगदी वेळ घालविण्याचा छंद म्हणून सुरू केलेल्या प्रवासाला अर्थपूर्ण वळण लागते. आणि जसे जीवन नेहमीच्या आश्चर्य, अपेक्षा आणि चढ-उतारांत सुरू राहते, रमा आणि आदित्य या दोघांनीही बदल घडवून आणला पाहिजे-एकत्रितपणे, परंतु वैयक्तिक पातळीवर. सिरीजच्या प्रदर्शनापूर्वी, प्रिया बापट आणि उमेश कामत यांनी दिग्दर्शक वरुण नार्वेकरसह प्रचारासाठी शहराला भेट दिल्याने नागपूरमधील चाहत्यांना एक मजेदार आणि अविस्मरणीय आश्चर्य वाटले. वास्तविक जीवनातील विनोद आणि रील-लाइफ केमिस्ट्रीमध्ये सहजपणे वावरणारी सुप्रसिद्ध जोडी, चाहत्यांना हसवते, आपले समीकरण स्क्रीनच्या पलिकडे खरे नवरा-बायको म्हणूनही तितकेच सुंदर आहे, हे पटवून देते.

# नगराध्यक्षा विश्रांतीताई कदम यांच्याकडून शहराला पाणीपुरवठा टँकरची भेट

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती सहसा आपले वैयक्तिक सोहळे थाटामाटात साजरे करतात, मात्र मुदखेडच्या नगराध्यक्षा सौ. विश्रांती कदम यांनी आपल्या लग्नाच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. शहरातील पाणीटंचाईची दाहकता लक्षात घेऊन त्यांनी स्वखर्चातून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे.

आज सकाळी ११ वाजता श्री कालीजी देवी मंदिर येथे नगराध्यक्षांनी सहकुटुंब देवीचे दर्शन घेतले. देवीची विधिवत पूजा केल्यानंतर, टँकरचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मंदिराच्या परिसरातून टँकरला हिरवा झेंडा दाखवून शहरातील टंचाईग्रस्त भागांकडे रवाना करण्यात आले.




मुदखेड शहरात पाणी टंचाई नाही परंतु काही भागांत पाणीटंचाईची समस्या जाणवत होती. लग्नाच्या वाढदिवसावर विनाकारण खर्च करण्याऐवजी तो पैसा जनकल्याणासाठी वापरण्याचा निर्णय कदम कुटुंबाने घेतला. या उपक्रमांतर्गत शहरातील ज्या भागात पाण्याची तीव्र टंचाई आहे, तिथे आता मोफत पाणी पोहोचवले जाणार आहे. लग्नाचा वाढदिवस हा आनंदाचा क्षण असतो, पण हा आनंद जेव्हा नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान पाहून द्विगुणित होतो, तेव्हा त्याचे महत्त्व अधिक वाढते. शहराची सेवा करणे हेच आमचे प्रथम कर्तव्य असं नगराध्यक्षा सौ. विश्रांती माधव कदम यांनी सांगितले यापुर्वीही मुदखेड भाजपचे शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण , पाणीपुरवठा सभापती शाम चंद्रे यांनी सुध्दा स्वखर्चातून दोन टँकर घेऊन शहरात पाणी पुरवठा सुरळीत असुन या अनोख्या उपक्रमाचे मुदखेड शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# येवती तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या विरोधात तक्रार !

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

मुखेड तालुक्यातील मौजे येवती येथील वक्त बोर्डाच्या जागेवरील झालेल्या अतिक्रमण संदर्भात अनेक वर्षांपासून येथील एका शेख चांदपाशा निजामोदीन या मुस्लिम युवकांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी रितसर निवेदने , देऊन, अनेक वेळा आमरण उपोषणाचे हत्यार उपसले पण गाव पुढाऱ्यांच्या इशारावरुन अद्यापही या संदर्भात रितसर तोडगा निघाला नाही तर दुसरीकडे वरिष्ठांनी दिलेल्या निकालाची येथील तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या कडून पायमल्ली होत असल्याची तक्रार दि. १८ मार्च रोजी संबंधित अधिकाऱ्यांकडे शेख चांदपाशा निजामोदीन यांनी केली आहे.

सविस्तर माहिती अशी की जिल्हाधिकारी नांदेड यांनी



दिलेल्या दि. २२/०९/२०२५ रोजीच्या दिलेल्या वक्फ बोर्डाच्या निकालावर तसेच तहसिलदार, मुखेड यांच्या दि.०२/०३/२०२६ च्या आदेशान्वये मंडळअधिकारी व तलाठी हे जाणीवपुर्वक ७/१२ वर जागेची नोंद करून घेण्यास टाळाटाळ करीत असल्याचे शेख चांदपाशा निजामोदीन यांचे म्हणणे आहे. अर्जदार चाँदपाशा निजामोद्दीन शेख रा. येवती ता. मुखेड जि. नांदेड येथील रहिवाशी असुन मा. जिल्हाधिकारी नांदेड यांनी दिलेल्या दि. २२/०९/२०२५ रोजीच्या दिलेल्या वक्फ बोर्डाच्या निकालावर तसेच तहसिलदार , मुखेड यांच्या दि.०२/०३/२०२६ च्या आदेशान्वये मंडळअधिकारी व तलाठी हे जाणीवपुर्वक ७/१२ वर जागेची नोंद करून घेण्यास टाळाटाळ करीत असुन त्यांच्याविरुध्द संबंधित जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी देगलुर व तहसीलदार यांनी योग्य ते कार्यवाही करावी अशी मागणी शेख चांदपाशा निजामोदीन यांनी केली आहे.

# जिल्ह्यात चार दिवसांसाठी यलो अलर्ट जारी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि ३० मार्च रोजी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि ३० व ३१ मार्च तसेच दि १ व ३ एप्रिल या दोन दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. हे चार दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# रागातुन जीवे ठार मारण्यासाठी गोळीबार करणारा अटकेत

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाण्यात शेल पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्याकरीता फिर्यादी इंजमाम सिध्दीकी वय २६ वर्षे, हे त्यांची गाडी अँक्टीव्हा क्रं. MH 04 MB 1065 यात पेट्रोल टाकण्यासाठी आले असता यातील आरोपी जबीउल्ल खान याने मागील दोन महिन्यापुर्वी " तेरा बाप कैसे मरा, ट्रेन से कटकर मराना, कुत्ते के मौत" असे फिर्यादी यांचे वडीलांबददल अपशब्द वापरल्याचे कारणावरून त्यांच्यात वारवार भांडण होत असल्याने त्याचा राग मनात धरून फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उददेशाने कोणत्यातरी बनावटीच्या अग्निशस्त्राने त्यांच्यावर दोन राउंड फायर करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला तसेच त्यांची मैत्रीण इंजल फर्नांडीस हीस बंदुकीचा धाक दाखवून फिर्यादी यांची गाडी जबरीने घेवून गेले



याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून नौपाडा पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ८४/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०९ (१), ३०९ (४),३५१ (३), ३५२ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ सह महा. पो. कायदा कलम ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. नमुद गुन्हयातील आरोपी याने सदर गुन्हा केले नंतर त्याचे वापरते मोबाईल क्रमांक बंद करून आपले अस्तित्व लपवुन राहत होता. सदर आरोपीस पकडणे पोलीसांना समोर एक आव्हाहन ठरले होते. मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे सलग दोन दिवस आरोपीच्या शोधात असताना पो.ना/७१८३ सुनिल धोंडे यांना त्यांचे गुप्तबातमीदारामार्फत मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून सदर आरोपी हा रोड नं. ०२, कुसुमाग्रज मार्ग, समतानगर चौक, वागळे ईस्टेट, ठाणे या ठिकाणी येणार असल्याची खात्रीशीर माहीती प्राप्त झाल्याने पोलीस पथकाचे मदतीने सापळा रचुन दिनांक २९/०३/२०२६ रोजी सदर आरोपीस ताब्यात घेण्यात आले असुन आरोपीची अंगझडती घेता त्याचे अंगझडतीमध्ये त्याने गुन्हयात वापरलेले एक देशी बनावटीचे अग्निशस्त्र (पिस्टल) व गुन्हयात चोरीस गेलेली पांढ-या रंगाची अॅक्टीवा मोटारसायकल हस्तगत करण्यातआली सदर गुन्हयाचा तपास सपोनि भांगे करीत असुन आरोपीस मा. न्यायालयात हजर करून त्याची दिनांक ०२/०४/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी घेण्यात आली आहे.

# बारडच्या शितलादेवी मंदिरात यात्रा महोत्सव

## हनुमान मूर्तीची पालखी मिरवणूक : कुस्त्यांचा फड रंगणार

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

बारड येथील तेलंगणा ,आंध्र प्रदेश , मराठवाडा, विदर्भातील जागृत देवस्थान तसेच भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शितलादेवी (पोचम्मा) देवीच्या यात्रा महोत्सवास मोठ्या उत्साहात सुरुवात झाली असुन. यानिमित्त हनुमान मूर्ती पालखी मिरवणूक ग्रामस्थांच्या वतीने काढण्याची प्रथा असुन कुस्त्यांचा फडही रंगणार आहे .

पोचम्मा देवीचे पुरातन काळातील भव्य वडाच्या झाडाखाली वसलेले मंदिर आहे . शीतला मातेचे वास्तव्य विहिरीत असल्याचे सांगितले जाते . थोर स्वातंत्र्य सेनानी साहेबराव देशमुख बारडकर यांनी देवस्थानासाठी चार गुंठे जागा दान दिली आहे . चैत्र वैशाख पौर्णिमेला दरवर्षी यात्रा भरत असते या निमित्त लाखो



भक्त चंद्रपूरच्या देवीचे दर्शन घेऊन शीतला देवीच्या दर्शन घेण्याची प्रथा रूढ आहे . चंद्रपूरच्या आईची धाकटी बहीण म्हणून पोचम्मा देवीची ओळख आहे . भक्तांचे श्रद्धास्थान असल्याने तेलंगणा , आंध्र प्रदेश , विदर्भ , मराठवाड्यासह जिल्ह्यातील भक्त नवसाची परतफेड करण्यासाठी मनोभावी आराधना करतात . नवरात्र महोत्सवात ओटी भरण्यासाठी सुहासिनीची लगबग असते . नवरात्र अष्टमीला तांबोल व दुधाचा प्रसाद वाटप केला जातो . संस्थांच्या वतीने दरवर्षी पाडव्यानिमित्त शितला देवीचे बैलगाडीतून आंबील काढण्याची पद्धत आहे . ग्रामस्थांच्यावतीने दरवर्षी हनुमान जयंतीला यात्रा महोत्सव निमित्त भव्य पालखी मिरवणूक काढली जाते . शंभर वर्षांपूर्वीची सुंदर आकर्षक लाकडी नागोबा कुंभार यांनी तयार केलेल्या मूर्तीची गावातील प्रमुख रस्त्यावरुन भक्तीमय वातावरणात शोभायात्रा काढण्यात येत असते यावर्षी दि २ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता भव्य शोभायात्रा निघणार आहे . यामध्ये सर्वधर्मीय युवक सहभागी होत असतात.

ग्रामपंचायत च्या वतीने यात्रेनिमित्त भव्य कुस्तीची दंगल दि ३ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता कुस्त्यांचा फड रंगणार आहे . यानिमित्त पैलवानांसाठी आकर्षक पारितोषिक ठेवण्यात आली आहे . प्रथम पारितोषिक अकरा हजार रुपये, द्वितीय पारितोषिक सात हजार रुपये ठेवण्यात आले आहे . याशिवाय अनेक आकर्षक बक्षीसे पैलवानांना देण्यात येणार आहेत .

# खेळाडू निवड चाचणी आयोजित

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

मार्च क्रीडा व युवक सेवा संचालनालयमार्फत राज्यातील विकासाकरीता "मिशन लक्ष्यवेध" या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत खेळाडू निवड चाचणी आयोजित करण्यात येणार आहे. या चाचणीमध्ये विविध क्रीडा प्रकारांतील होतकरू व गुणवान खेळाडूंना प्रोत्साहन व पुरस्कार, खेळांडूना करीअर मार्गदर्शन खेळांडूच्या क्षमता विकासासाठी देशी, विदेशी संस्थाचा सहयोग हे सर्व घटक विकसित करणे अभिप्रेत आहे. उपरोत घटक विकसीत करण्याकरीता आवश्यक प्रयत्न हे फक्त राज्यस्तरावरून नव्हे तर जिल्हास्तरावरून देखील होणे अपेक्षित आहे. त्या करीता नांदेड जिल्हयास मिशन लक्ष्यवेध या योजने अंतर्गत जिल्हास्तरावर प्रतिभा विकास केंद्र नांदेंड करीता टेबल टेनिस, बॅडमिंटन, आर्चरी, हॉकी, अॅथलेटीक्स या पाच क्रीडाप्रकारांचे खेळांची केंद्र सुरू करावयाची आदेश प्राप्त झाले होते.

# प्रज्ञा बुद्ध विहार अर्धापूर येथे नियोजित पुतळ्याच्या चबुतऱ्याचे भूमिपूजन मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न

**अर्धापुर : (समर्थ गांवकरी)**

अर्धापूर येथील प्रज्ञा बुद्ध विहार येथे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नियोजित पुतळ्याच्या चबुतऱ्याचा भूमिपूजन सोहळा दि ३० मार्च रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी अर्धापूर नगरपंचायत चे मुख्याधिकारी जगदीश दळवी नगराध्यक्ष प्रवीण देशमुख उपनगराध्यक्ष मुक्तेदीर खान पठाण माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, नगरसेवक सोनाजी सरोदे, प्रल्हाद माटे, व्यंकटी राऊत , नामदेव सरोदे, बबन लोखंडे, केशव कोल्हे, शहबाज बेग, रिजवान शेख, पत्रकार ओमप्रकाश पत्रे राजेश्वर देशमुख वैभव माटे शुभम लुटे उमेश सरोदे भीमराव सरोदे भुजंग माटे अशोक माटे गंगाराम राऊत महेंद्र सरोदे,



सामाजिक कार्यकर्त्या शितल कांबळे इंजिनियर वानखेडे , कांबळे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना उमेश सरोदे यांनी मागील दहा वर्षापासून आंबेडकर अनुयायी हे पुतळे उभे राहण्याच्या प्रतीक्षेत संयम ठेवून होते राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण , माजी आ अमिता चव्हाण, विद्यमान आ श्रीजया चव्हाण यांच्या प्रयत्नामुळे आज सोन्याचा दिवस आले असून लवकरात लवकर हे पुतळे उभे राहून अर्धापूरच्या वैभवात भर पडणार असल्याचे त्यांनी सांगितले. व चव्हाण परिवाराचे व सर्व अनुयायाचे आभार मानून पुतळे लवकर बसतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

# मयत व्यक्तीच्या अवयवदानाने ९ जणांना मिळाले जीवनदान

**ठाणे: (समर्थ गांवकरी)**

रस्ते अपघातात एका ३३ वर्षीय व्यक्तीचे ब्रेन डेड झाल्याने मृत्यू झाला. त्यानंतर त्याच्या कुटुंबियांच्या सहमतीने अवयव दानाचा निर्णय ठाण्यातील महावीर जैन हॉस्पिटलने घेतला. सदर व्यक्तीच्या अवयवदानाने मुंबईतील विविध रुग्णालयातील ९ जणांना अवयवदान करून जीवनदान देण्यात महावीर जैन हॉस्पिटलला यश आल्याचे हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ. रणवीर कोष्टी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. ठाण्यातील हाजुरी येथील महावीर जैन हॉस्पिटलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत हॉस्पिटलचे विश्वस्त अजय आशर, महेश राजदेरकर आणि डॉक्टरची टीम उपस्थित होती. २९ मार्च रोजी ठाण्यातील महावीर जैन हॉस्पिटलमध्ये एक ३३ वर्षीय व्यक्तीचे रस्ते अपघातात ब्रेन डेड झाल्यानंतर नातेवाईकांना माहिती देत मृत घोषित करण्यात आले. त्यानंतर मयत व्यक्तीच्या अवयवदानाचा निर्णय त्याच्या नातेवाईकांच्या सहमतीने घेण्यात आला. यामध्ये महावीर जैन हॉस्पिटलचे डॉक्टर रणवीर कोष्टी यांनी महत्वाची भूमिका बजावली. मुंबईतील विविध हॉस्पिटलच्या डॉक्टरांना संपर्क करून हदय, २ किडनी, लिव्हर, पॅक्ट्रिया, कॉर्निया, बोन ब्राईज असे पार्ट डोनेट करण्यासाठी संकलित करण्यात आले. यामध्ये लिव्हरचे दोन पार्ट करण्यात आले. त्याला स्प्लीट लिव्हर असे म्हणतात. केईम आणि अपोलो हॉस्पिटल असे दोन ठिकाणी पाठविण्यात आले. यात विशेष म्हणजे ९ वर्षाच्या पेशंटला लिव्हर ट्रान्सप्लाट करण्यात यश आले. हार्ट, लिव्हर आणि किडनी हे २४ तासात ग्रीन कॉरिडॉरद्वारे रवाना करण्यात आले.

# जडाबाई दुगड शिक्षण संकुल येथे संगणक कक्ष आणि ग्रंथालयाचे उद्घाटन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुण्यातील सुखसागर परिसरात गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी उभारण्यात आलेल्या जडाबाई दुगड शिक्षण संकुल येथे संगणक कक्ष आणि ग्रंथालयाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. लेडीज सर्कल इंडिया यांच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती शीशम सबरवाल आणि क्षेत्र अध्यक्षा श्रीमती मेघा राठी यांच्या हस्ते या अत्याधुनिक लॅबचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गौरव दुगड आणि मोनल दुगड उपस्थित होते. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका नंदा राजाराम भोसले, पुणे कॉस्मोपोलिटन राऊंड टेबल 110 चे अध्यक्ष अश्विन संघवी, पुणे कॉस्मोपोलिटन लेडीज सर्कल 81 च्या अध्यक्षा सुमन पोरवाल, सचिव वीनीता खाटर, कोषाध्यक्ष




विनिता ओसवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना संस्थेच्या सचिव मोनल दुगड यांनी सांगितले की, "सुमारे 40 वर्षांपूर्वी गोरगरीब मुलांसाठी सुरू केलेली ही शाळा आज मोठ्या प्रमाणात विकसित झाली आहे. येथे सेमी-इंग्लिश माध्यम सुरू करण्यात आले असून कमी शुल्कात दर्जेदार शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आता लायब्ररी आणि संगणक लॅबची भर घालण्यात आली आहे." ही संस्था कै माणिकचंद नारायणदास दुगड यांनी सुरू केली असून सध्या प्रमोद माणिकचंद दुगड हे चेअरमन म्हणून कार्यरत आहेत. तर गौरव दुगड उपाध्यक्ष आणि मोनल दुगड सचिव पदावर कार्यरत आहेत. संस्थेच्या माध्यमातून सुखसागर परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. या प्रसंगी शीशम सभरवाल यांनी या संयुक्त प्रयत्नांचे कौतुक केले आणि मानवी जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तंत्रज्ञान आणि पुस्तकांची उपलब्धता कशा प्रकारे संधींमधील तफावत भरून काढू शकते आणि विद्यार्थ्यांसाठी एक उज्ज्वल भविष्य घडवू शकते, यावर त्यांनी प्रकाश टाकला. नव्याने उभारण्यात आलेला संगणक कक्ष मुलांना आवश्यक डिजिटल कौशल्ये विकसित करण्यास मदत करेल, तर ग्रंथालय संस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय आणि आजीवन शिकण्याची वृत्ती जोपासण्यास हातभार लावेल अशी अपेक्षा आहे. दीर्घकालीन सकारात्मक प्रभाव निर्माण करणाऱ्या सामाजिक कार्यांमध्ये योगदान देताना दोन्ही संस्थांच्या सदस्यांनी आपला अभिमान व्यक्त केला. खऱ्या अर्थाने सक्षमीकरण हे केवळ शिक्षणच नव्हे, तर स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून दिल्यानेच साध्य होते, या आपल्या विश्वासाचा त्यांनी पुनरुच्चार केला. या उपक्रमासाठी पुणे कॉस्मोपोलिटन राऊंड टेबल 110 आणि पुणे कॉस्मोपोलिटन लेडीज सर्कल 81 यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच मोहित गलानी, भावना गलानी, पूर्वा संघवी, प्रीती कटारिया आदी मान्यवरांचीही उपस्थिती होती.

# दिव्यात बस थांबा/शेड अभावी प्रवासी भर उन्हात

## प्रशासनासह लोकप्रतिनिधिंचे अपयश

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



दिवा रेल्वे स्थानकात लोकल प्रवास करण्यासाठी प्रवाश्यांना जीवघेणा प्रवास करावा लागतो परंतू आता भर उन्हाळ्यात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बस थांब्यावर निवारा शेड अभावी ४० च्या आसपास वाढलेल्या तापमानात उभे रहावे लागत आहे. सदर चौकातून ठाणे महानगरपालिकेच्या टी.एम.टी, नवी मुंबईच्या एन.एम.एम.टी. बसेसची नेहमीच वर्दळ पहायला मिळते. मात्र, जिथे टी. एम.टी. बसचे थांबे आहेत त्या ठिकाणी प्रवाशांना ना हक्काचा बस थांबा, ना आश्रयासाठी शेड अशी गैरसोय पहायला मिळत आहे. त्यामुळे विशेषतः विद्यार्थी, गरोदर महिला, आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पहायला मिळत असून, संबंधित ठाणे महानगरपालिका परिवहन प्रशासनाने शिळफाटा जंक्शन नाक्यापासून ते दिव्यापर्यंत प्रमुख मार्गांवर हक्काचे शेडसह बस थांबे उभे करावे अशी आग्रही मागणी होत आहे.

विशेष म्हणजे अनेक ठिकाणी बस थांब्याजवळ खासगी वाहतूक करणाऱ्या वाहने उभी असलेली पहायला मिळतात. त्यामुळे, नाइलाजस्तव आलेल्या बसेस भर रस्त्यावर उभ्या राहत असल्याने, त्यातून मार्ग काढत प्रवाशांना बसमध्ये चढताना तारेवरची कसरत करावी लागते. दरम्यान, प्रवाशांचा चांगला प्रतिसाद ठाणे महानगरपालिकेच्या टी. एम.टी, नवी मुंबई महानगरपालिकाच्या एन.एम.एम.टी. मिळत असूनही, मूलभूत सोयी-सुविधां अभावी प्रवासी वंचित रहात असल्याचे वास्तव परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी, सार्वजनिक वाहतूक सक्षम केली पाहिजे, असे मत अनेक संस्था, संघटनांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे, ठाणे आणि नवी मुंबई कडून येणाऱ्या व जाणाऱ्या टी.एम.टी. आणि एन.एम.एम.टी. बसच्या फेऱ्यासुद्धा वाढविण्यात आल्या त्यास नागरिकांनी सुद्धा चांगला प्रतिसाद दिला. दिवसभर दिवा परिसरातील सर्वच बसेस प्रवाशांनी तुडुंब भरून ये जा करतात. मात्र ज्या ठिकाणी बसेस थांबतात त्या ठिकाणी, अधिकृत बस थांबा निदर्शनास पडत नसल्याने तसेच प्रवासी भर उन्हात बसची वाट पाहत उभे असतात.

शिळफाटा जंक्शन नाका, खार्डीगांव, दिवा प्रभाग समितीसह परिसरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला उत्तम प्रतिसाद देत असूनही, प्रवाशांना मात्र ना हक्काचा बस थांबा, ना आश्रयासाठी शेड अशा गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

याकडे, ठाणे महानगरपालिका परिवहन प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. दिव्यातील प्रवाश्यांना सुविधा मिळत नसल्याने हे दिवा शहरातील सर्व लोकप्रतिनिधिंचे अपयश असल्याचे प्रवाश्यांनी स्पष्ट सांगितले आहे.

# संचालकपदी एकनाथराव आळेकर

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी श्रीगोंदा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष एकनाथराव आळेकर यांची एकमताने निवड करण्यात आली. कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन व संचालक बाबासाहेब भोस यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे संचालक मंडळातील सर्वसाधारण मतदारसंघ क्रमांक १, श्रीगोंदा गट क्रमांक १ मधील एक जागा रिक्त झाली होती. या नैमित्तिक रिक्त जागेसाठी मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या मान्यतेनंतर निवड प्रक्रिया पार पडली. दि. ३० मार्च रोजी कारखाना कार्यस्थळावर संजय गोंदे (अध्यासी अधिकारी तथा प्रादेशिक उपसंचालक, साखर, अहिल्यानगर) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत एकनाथराव आळेकर यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या नावाचा प्रस्ताव संचालक लक्ष्मणराव रायकर यांनी मांडला, तर श्रीनिवास घाडगे यांनी त्यास अनुमोदन दिले. एकनाथराव आळेकर यांनी श्रीगोंदा नगरपालिका तसेच इंदिरा गांधी नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून सामाजिक व सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. स्वर्गीय शिवाजीराव बापू नागवडे यांचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्यांच्या निवडीबद्दल कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे, व्हा. चेअरमन सौ. मेघाताई औटी, संचालक मंडळ सदस्य, तसेच अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, दूध संघाचे चेअरमन दिलीप वागस्कर आदी मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# राज्यातील पहिले खाजगी पशुवैद्यकीय महाविद्यालय परिक्रमा शैक्षणिक संकुलात सुरू

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



काष्टी (ता. श्रीगोंदा) येथील मा. नामदार श्री. बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट संचलित परिक्रमा शैक्षणिक संस्थेला शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून राज्यातील पहिले खाजगी पशुवैद्यकीय (BVSc & AH) महाविद्यालय सुरू करण्यास केंद्र सरकारकडून मान्यता मिळाली आहे, अशी माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते यांनी दिली.

हे महाविद्यालय महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (MAFSU), नागपूर यांच्याशी संलग्न असणार असून, आवश्यक असलेले विद्यापीठाचे संलग्नता पत्र, राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) तसेच केंद्र सरकारकडून परवानगीपत्र (LOP) प्राप्त झाले आहे. तसेच भारतीय पशुवैद्यकीय परिषद (VCI) यांची मान्यताही मिळालेली आहे. महाविद्यालयात दरवर्षी ८० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. महाविद्यालय सुरू करण्यापूर्वी संस्थेच्या प्रतिनिधींनी देश-विदेशातील विविध खाजगी व सरकारी महाविद्यालयांना भेटी देऊन आवश्यक माहिती संकलित केली आहे. विद्यार्थ्यांसाठी अनुभवी शिक्षकवर्ग, प्रशस्त व स्वतंत्र इमारत, सुसज्ज ग्रंथालय, अत्याधुनिक प्रयोगशाळा, पशुचिकित्सा दवाखाना, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह, खेळाचे मैदान तसेच बस सुविधा अशा आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परिक्रमा शैक्षणिक संकुलात आधीच CBSE शाळा, तंत्रनिकेतन, फार्मसी, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, बीबीए, बीसीए, एमसीए, विधी महाविद्यालय तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये कार्यरत आहेत. नव्याने सुरू होणाऱ्या पशुवैद्यकीय महाविद्यालयामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या दृष्टीने मोठी संधी उपलब्ध होणार आहे. अधिक माहितीसाठी परिक्रमा शैक्षणिक संकुलाला प्रत्यक्ष भेट देण्याचे आवाहन पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. के. एस. रिसम यांनी केले आहे.

# काढणी सुरू असताना पाऊस

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

कुमशेत, गोळेगाव, शिरोली खुर्द, कबाडवाडी, सुसरबाग, महाबरेवाडी, हापुस बाग, विठ्ठलवाडी, येणेरे, निरगुडे, बेलसर व इतर परिसरात दुपारी ४ ते सायंकाळी ७ . ३ ० दरम्यान विजेच्या कडकडासह गारांचा मुसळधार पाऊस पडल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांच नुकसान झाले आहे. याबाबत तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी ताबडतोब पंचनामाचे आदेश द्यावे अशी माहिती सर्व शेतकरी बांधव यांच्या वतीने शिरोली बुद्रुक कृषक सेवा सोसायटी संचालक संतोष शिवाजी डोके यांनी सांगितली आहे. या परिसरात द्राक्ष, चिकु, आंबा, डाळिंब गारांच्या पावसामुळे मातीमोल नुकसान झालेले आहे . कांदा टोमॅटो, कोथिंबीर, गहु, बाजरी, मेथी व इतर पिके यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# स्टाईल आयकॉन हृतिक रोशन ONN चा ब्रँड ॲम्बेसेडर

**कोलकाता : (समर्थ गांवकरी)**




देशातील आघाडीची इनरवेअर कंपनी लक्स इंडस्ट्रीज लिमिटेड ने आपल्या प्रीमियम वेअर ब्रँड ONN साठी बॉलिवूड अभिनेता हृतिक रोशन यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती जाहीर केली आहे. या निर्णयाद्वारे कंपनी भारतातील वेगाने वाढणाऱ्या प्रीमियम इनरवेअर आणि थर्मल वेअर बाजारपेठेत आपली पकड अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे. कंपनीच्या मते, ही भागीदारी ONN ब्रँडची ओळख अधिक बळकट करण्यासोबतच विशेषतः युवा आणि महत्त्वाकांक्षी ग्राहकांपर्यंत पोहोच वाढवण्याच्या धोरणाचा भाग आहे. ONN ला आधुनिक लाइफस्टाइल ब्रँड म्हणून सादर करण्यात आले असून, तो कम्फर्ट, परफॉर्मन्स आणि स्टाईल यांचा संतुलित अनुभव देतो. अशोक तोडी, चेअरमन, लक्स इंडस्ट्रीज यांनी सांगितले की, ही भागीदारी कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये प्रेरणादायी आणि मजबूत ब्रँड उभारण्याच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. ONN हा नवीन पिढीसाठी आधुनिक डिझाइन, अधिक आराम आणि स्टाईल देण्याच्या कंपनीच्या विचारांचे प्रतिनिधित्व करतो आणि हृतिक रोशन यांचे व्यक्तिमत्त्व व फिटनेस ब्रँडच्या मूल्यांशी सुसंगत आहे. तर साकेत तोडी, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, लक्स इंडस्ट्रीज यांच्या मते, या सहकार्यामुळे ब्रँडची दृश्यता वाढेल आणि प्रीमियम तसेच परफॉर्मन्स-आधारित इनरवेअर शोधणाऱ्या ग्राहकांशी अधिक दृढ नातं निर्माण होईल. या सहकार्याबाबत प्रतिक्रिया देताना Hrithik Roshan (हृतिक रोशन) यांनी सांगितले की, वैयक्तिक स्टाईलची पायाभूत गोष्ट म्हणजे आराम आणि आत्मविश्वास. ONN चा गुणवत्ता, नवकल्पना आणि आधुनिक डिझाइनवरील भर त्यांच्या लाइफस्टाइलशी जुळणारा आहे. या मोहिमेत ते टीव्ही, डिजिटल प्लॅटफॉर्म, रिटेल आणि आउटडोअर माध्यमांवर विविध जाहिरात उपक्रमांमध्ये दिसणार आहेत. या मोहिमेची निर्मिती रेडिफ्यूजन ब्रँड सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी केली आहे. प्रमोद शर्मा, नॅशनल क्रिएटिव्ह डायरेक्टर, रेडिफ्यूजन यांनी सांगितले की, ONN हा स्टाईल, परफॉर्मन्स आणि दैनंदिन आराम यांचा उत्कृष्ट संगम आहे आणि हृतिक रोशन हे या सर्व गुणांचे अचूक प्रतिनिधित्व करतात. देशभरातील मल्टी-चॅनल प्लॅटफॉर्मवर ही मोहीम सुरू करण्यात येत असून, त्यामुळे ONN ची पोहोच स्टाईल-जागरूक युवा ग्राहकांपर्यंत अधिक मजबूत होणार आहे. या नव्या भागीदारीमुळे लक्स इंडस्ट्रीज लिमिटेड ONN ब्रँडच्या वाढीस गती देत प्रीमियम सेगमेंटमध्ये आपली स्थिती अधिक भक्कम करण्याच्या दिशेने पुढे जात आहे.

# पत्रकारिता क्षेत्रात नंदकुमार कुरुमकर यांचे उल्लेखनीय योगदान

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करत श्री नंदकुमार कुरुमकर यांनी संस्था, विद्यालय आणि विद्यार्थ्यांसाठी भरीव योगदान दिले आहे, असे प्रतिपादन सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री राजेंद्र दादा नागवडे यांनी केले. लोणी व्यंकनाथ येथील व्यंकनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सेवक व पत्रकार श्री नंदकुमार कुरुमकर यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी महाराष्ट्र शिक्षकेतर सेवक महासंघाचे अध्यक्ष श्री वाल्मिक सुरासे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. श्री कुरुमकर यांनी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेत तब्बल ३९ वर्षे सेवा बजावत नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती स्वीकारली. आपल्या मनोगतात त्यांनी लोकनेते स्वर्गीय बापूंच्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, त्यांच्या प्रयत्नांमुळे तालुक्यात शिक्षणाची गंगा खेडोपाडी पोहोचली. याच संस्थेत शिक्षण घेऊन पुढे नोकरीची संधी मिळणे ही आपल्या आयुष्यातील सर्वात मोठी शिदोरी असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महासंघाचे अध्यक्ष श्री वाल्मिक सुरासे यांनी कुरुमकर यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या संयमी व शांत स्वभावाचा विशेष उल्लेख केला. शिक्षकेतर सेवकांच्या निरोप समारंभासाठी एवढ्या मोठ्या संख्येने मान्यवर व नागरिक उपस्थित राहणे ही त्यांच्या कार्याची खरी पावती असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नागवडे कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन तथा ज्येष्ठ संचालक सुभाष काका शिंदे यांनीही कुरुमकर यांच्या प्रामाणिक सेवाभावाचा गौरव केला. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय राहून समाजाच्या समस्या मांडत राहाव्यात, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महासंघाचे अध्यक्ष वाल्मिक सुरासे यांनी श्री नंदकुमार कुरुमकर यांची राज्य शिक्षकेतर महासंघाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी नियुक्ती जाहीर केली.

या कार्यक्रमास राज्य सचिव पाराजी मोरे, ज्येष्ठ मार्गदर्शक समशेर पठाण, परशुराम वेताळ, राजू पठाण, प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, माजी संचालक दिलीपराव काकडे, विलासराव काकडे, उपसरपंच चित्राताई पवार, पुरुषोत्तम बापू लगड, गणपतराव काकडे, इन्स्पेक्टर सचिनराव लगड, बी. के. लगड यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य बाळासाहेब जठार यांनी केले. सूत्रसंचालन गणेश गायकवाड व प्रा. नंदकुमार पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. पुष्पलता काकडे यांनी मांडले.

# रावेर–पुनखेडा पातोंडी मार्गाची दुरवस्था !

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

खड्डे, सैल खडी आणि वाहानांमुळे उडणाऱ्या धुळीमुळे रस्त्या लगतच्या केळीची खालवली अपघाताचा धोका वाढला; शेतकऱ्यांचे पिकांनाही फटका रावेर–पुनखेडा–पातोंडी या महत्त्वाच्या मार्गाचे काम अपूर्ण राहिल्याने नागरिक आणि शेतकरी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून सैल खडीमुळे वाहतूक करणे धोकादायक बनले आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात शेतीमालाची वाहतूक केली जाते. तसेच शाळेच्या बसेस आणि अतुर्ली–मुक्ताईनगर परिसरातील नागरिकांची नियमित ये-जा सुरू असते. मात्र, डांबरीकरण न झाल्याने वाहनांच्या हालचालीदरम्यान मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे.

### नाशिकमध्ये शिवसेना युवासेनेचा उत्तर महाराष्ट्र दौरा

# सुशीलकुमार शिंदे यांची जिल्हा समन्वयकपदी निवड

- नाशिक येथे शिवसेना युवासेनेच्या उत्तर महाराष्ट्र दौरा कार्यक्रमात महत्त्वपूर्ण संघटनात्मक निर्णय अहिल्यानगर जिल्ह्यातील युवक संघटना बळकट करण्यावर भर

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



येथे युवासेना कार्याध्यक्ष श्री. पूर्वेशजी प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली तसेच युवासेना सचिव श्री. किरण दादा साळी व उत्तर विभाग सचिव श्री. अविष्कार दादा भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पक्षाच्या उत्तर महाराष्ट्र युवा संघटन दौरा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात अहिल्यानगर जिल्हा प्रमुख व मार्गदर्शक श्री. अभिषेकराजे भोसले यांच्या सहकार्याने ॲड. सुशीलकुमार गुलाबराव शिंदे (श्रीगोंदा) यांची अहिल्यानगर जिल्हा शिवसेना युवासेनेच्या जिल्हा समन्वयकपदी निवड करण्यात आली. यावेळी युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख श्री. हेमंत लोखंडे, श्रीगोंदा तालुका प्रमुख श्री. निलेश गोरे तसेच तालुका संघटक श्री. प्रतीक बोरकर उपस्थित होते.

या निवडीबद्दल शिवसैनिक व कार्यकर्त्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, पुढील काळात जिल्ह्यात युवासेनेचे संघटन अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी ॲड. सुशीलकुमार शिंदे कटिबद्ध राहतील, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# कचरा केल्यास दंड

## ग्रामपंचायतीची धडाकेबाज मोहीम

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव येथे "स्वच्छ गाव, सुंदर गाव" या ध्येयाने ग्रामपंचायतीने कडक पावले उचलत प्लास्टिक बंदी व कचरा दंड मोहिमेला जोरदार सुरुवात केली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ही कारवाई राबविण्यात येत आहे. गावात प्लास्टिकचा वापर व कचरा करणाऱ्यांवर थेट कारवाई करत २० व्यापारी व ग्रामस्थांकडून एकूण २,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच ग्रामसभेच्या ठरावानुसार महिलांबाबत अपशब्द वापरणाऱ्या ३ ग्रामस्थांकडून १,५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला, ज्यामुळे सामाजिक शिस्तीबाबतही कडक संदेश देण्यात आला. या मोहिमेत लोकनियुक्त सरपंच पुरुषोत्तम यशवंत लगड, उपसरपंच विलास बाळासाहेब शितोळे, सदस्य नंदू काका लगड, निखील लगड, ग्रामपंचायत अधिकारी कवडे एस. एस. तसेच सर्व कर्मचारी सहभागी झाले होते. सरपंच पुरुषोत्तम लगड यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, "प्लास्टिकचा वापर टाळा आणि गाव स्वच्छ ठेवा, अन्यथा दंडाची कारवाई अटळ आहे." ग्रामपंचायतीच्या या धडाकेबाज कारवाईमुळे गावात खळबळ उडाली असून स्वच्छतेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होत आहे. पुढील काळात ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे.

# आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया यांनी केली पायाभरणी

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



आज एएम/एनएस इंडियासाठी अतिशय महत्त्वाचा दिवस आहे, कारण आंध्र प्रदेशातल्या अनाकापल्ली जिल्ह्यातील राजय्यपेटा येथे ८.२ दशलक्ष टन दरसाल क्षमता असलेल्या एकात्मिक स्टील प्रकल्पाची पायाभरणी झाली आहे (पर्यावरण मंजुरीनुसार क्षमता). या प्रकल्पासाठी अंदाजे ७०,००० कोटी रुपयांहून अधिकची गुंतवणूक अपेक्षित असून ती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. याशिवाय, प्रकल्पाच्या बांधकाम व विकासाच्या प्रक्रियेदरम्यान सुमारे एक लाख थेट व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. या समारंभाला आंध्र प्रदेशचे माननीय मुख्यमंत्री श्री. एन. चंद्राबाबू नायडू, माननीय केंद्रीय मंत्री (स्टील व अवजड उद्योग) श्री. एच. डी. कुमारस्वामी, आंध्र प्रदेशचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. के. पवन कल्याण, तसेच आंध्र प्रदेशचे माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स व संप्रेषण, मनुष्यबळ विकास (एचआरडी) आणि रिअल-टाइम गव्हर्नन्स मंत्री श्री. नारा लोकेश यांनी उपस्थित राहून गौरव वाढविला. तसेच आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष, श्री. लक्ष्मी मित्तल, आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाचे अध्यक्ष व आर्सेलर मित्तलचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आदित्य मित्तल, निप्पॉन स्टील कॉर्पोरेशनचे प्रतिनिधी संचालक, अध्यक्ष व सीओओ श्री. तदाशी इमाई, निप्पॉन स्टील कॉर्पोरेशनचे उपाध्यक्ष व आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाचे संचालक मंडळाचे सदस्य श्री. ताकाहिरो मोरी, तसेच आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दिलीप उमेन उपस्थित होते.

या कार्यक्रमाला राज्यभरातून मोठ्या प्रमाणात उत्साही प्रतिसाद मिळाला आणि कार्यक्रम लक्षवेधक ठरला. हजारो लोकांनी या प्रसंगी सहभागी होण्यासाठी प्रवास केला. हा क्षण एएम/एनएस इंडियाच्या देशातील अत्याधुनिक स्टील उत्पादन सुविधा उभारण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्याची सुरुवात ठरला. आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडीया त्यांच्या उद्योगातील अग्रगण्य क्षमतांचा उपयोग करून भारताचे २०३०-३१ पर्यंत देशांतर्गत कच्च्या स्टील उत्पादन क्षमता ३०० एमटीपीएपर्यंत वाढवण्याचे ध्येय साध्य करणे हे उद्दिष्ट होते, जे राष्ट्रीय स्टील धोरणाशी सुसंगत आहे. नवीन क्षमता निर्माण करण्याबरोबरच, एएम/एनएस इंडियाने अनेक देशातील पहिले उच्च-गुणवत्तेचे स्टील्स बाजारात आणले आहेत. एएम/एनएस इंडिया ही देशातील पहिली एकात्मिक स्टील उत्पादक कंपनी आहे जिला स्टील मंत्रालयाच्या नव्याने स्थापन केलेल्या ग्रीन स्टील टॅक्सोनॉमी अंतर्गत ग्रीन स्टील प्रमाणपत्र मिळाले आहे. राजय्यपेटा येथे उभारण्यात येणाऱ्या नव्या कारखान्यातील पोलाद उत्पादनाची कामे दिनदर्शिकेतील वर्ष २०२९ च्या पहिल्या तिमाहीपासून सुरू होण्याची योजना आहे. पुढील काही तिमाहींमध्ये इतर युनिट्सही नियोजित व टप्प्याटप्प्याने कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. या कारखान्यात विविध प्रकारचे पोलाद दर्जे तयार केले जातील, ज्यामध्ये उच्च दर्जाचे व मूल्यवर्धित उत्पादनेही असतील. यामुळे भारताची आत्मनिर्भरता वाढेल, आयात कमी होईल आणि 'विकसित भारत २०४७'च्या उद्दिष्टांनुसार देशाचा उत्पादनाधार अधिक मजबूत होईल. या प्रसंगी एएम/एनएस इंडियाने आंध्र प्रदेश सरकारसोबत दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (MoUs) केले. या सामंजस्य करारांचा व्यापक उद्देश असा आहे की एएम/एनएस इंडिया, न्यू एज मेकर्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (NAMTECH) सोबत मिळून आंध्र प्रदेशात भविष्याभिमुख औद्योगिक प्रतिभा परिसंस्था निर्माण करेल.

# शेतजमिनींचे रूपांतर बिगरशेती जमिनीत होणे अन्नसुरक्षेसाठी गंभीर

## राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्याकडून शून्य प्रहरात मुद्दा उपस्थित; शेतजमिनींचे संरक्षण करण्याची मागणी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

देशातील कृषी क्षेत्र झपाट्याने अकृषी क्षेत्रात रूपांतरित होत असून, अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही अत्यंत गंभीर बाब आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतीयोग्य जमिनीचे प्रमाण कमी होणे चिंताजनक आहे. १४० कोटी नागरिकांच्या अन्नसुरक्षेसाठी सक्षम असलेल्या भारताला सुरक्षित ठेवायचे, तर शेतजमिनींचे संरक्षण करणे गरजेचे आहे, असे स्पष्ट मत राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत शून्य प्रहरात बोलताना मांडले.




प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "देशातील अनेक जिल्हे आणि शहरांमध्ये शेतीजमिनींची प्लॉटिंग करून निवासी प्रकल्प उभारले जात आहेत. यामुळे पेरणीयोग्य क्षेत्रात सतत घट होत आहे. पंजाबमध्ये मागील काही वर्षांत एक लाख हेक्टरपेक्षा अधिक जमीन अकृषिक घोषित करण्यात आली. सध्या भारतात केवळ सुमारे ४५ टक्के जमीनच शेतीखाली असून, त्यात सुमारे ९ टक्क्यांची घट झाली आहे. ही स्थिती कायम राहिल्यास अन्नसुरक्षा, शेतकऱ्यांची उपजीविका, जीएसटी उत्पन्न आणि पर्यावरणीय संतुलन यावर परिणाम होऊ शकतो." एका अभ्यासानुसार लोकसंख्येत एक टक्क्याने वाढ झाली, तर शेती क्षेत्र ०.४५ टक्क्यांनी कमी होते, असे त्यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांनी आपली शेतजमीन जपून ठेवत पुढील पिढीसाठी ती सुरक्षित करावी. आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्तापूर्ण बियाणे, सूक्ष्म सिंचन आणि सरकारी योजनांचा लाभ घेऊन उत्पादन वाढवावे, अशी सूचनाही त्यांनी केली. शेतजमिनीचे अकृषी क्षेत्रात रूपांतर केवळ व्यापक जनहिताच्या पायाभूत प्रकल्पांसाठीच मर्यादित असावे. उपजाऊ जमिनींचे संरक्षण करण्यासाठी कठोर कायदे लागू करावेत, तसेच जमिनींच्या वापरातील बदलांवर सॅटेलाइट व डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे नियंत्रण ठेवावे, अशी मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे कुलकर्णी यांनी केली.

तसेच शेतजमीन शेतीसाठीच वापरली जावी. त्यातूनही शेतकऱ्यांना जमीन विकावी लागल्यास सरकारने योग्य मोबदला देऊन ती खरेदी करून शेतीसाठीच वापर सुनिश्चित करावा, असेही त्यांनी सांगितले. कृषी क्षेत्र हे भविष्यातील महत्त्वाचे उद्योग ठरणार असल्याने त्याचे संवर्धन आणि संरक्षण ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# श्रीराम जन्मोत्सवा निमित्त विशाल धर्मसभा

**बिलोली : (समर्थ गांवकरी)**

बिलोली शहरात विश्व् हिंदू परिषद, बजरंगदल बिलोली प्रखंड यांच्या वतीने दि ४ एप्रिल रोजी शनिवारी श्रीराम जन्मोत्सवा निमित्त हिंन्दू महागर्जना रॅली व विशाल धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या धर्मसभेला हिंदुत्वाची बुलंद तोफ तेलंगणाचे आमदार टि. राजासिंह हे संबोधित करणार आहेत यामुळे तालुक्यातील सर्व हिंदू बांधव व भगिणींनी मोठ्या संख्येनी उपस्थित राहण्याचे आव्हान दि. २८ मार्च रोजी शासकीय निवास्थान येथे झालेल्या पत्रकार परिषदे दरम्यान विश्व् हिंदू परिषद, बजरंग दलाच्या वतीने करण्यात आले आहे.




श्रीराम जन्म मोत्सवा निमित्त शहरात विश्व् हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने पंधरा वर्षाची परंपरा कायम राखत यावर्षीही दि. ४ मार्च रोजी हिंदू महागर्जना रॅली व धर्मसभेच आयोजन कारण्यात आले आहे. या धर्मसभा आर्शीवचन म्हणुन नांदेड जिल्ह्यातील शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर, सदगुरु नराशाम महाराज येवतीकर, महंत नामदेव महाराज उमरजकर, वेंकटेशाचार्य महाराज जिअर स्वामी' मंदीर गाडीपुरा नाबेड, डॉ विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेड, या सह संत महंताचे आर्शिवचन होणार आाहे.

शोभायात्रा प्रारंभे बागेतील हनुमान मंदीर येथून दुपारी ठिक २ वाजता सुरुवात होईल. तद्रंतर जनावरांचा आठवडी बाजार देगलूर रोड येथे सायंकाळी ६ वाजता धर्मसभा होणर आहे.

या प्रसंगी विशेषत्वाने सनातन हिंदू धर्मास उभारी देणारे मठ मंदिर पुजारी, भंजनी मंडळी यांचा सत्कार आयोजीत केलेला आहे. तरी नांदेड जिल्ह्यातील सर्व मंठ मंदीर पुजारीं व हिंदू बांधवानी जास्ती जास्त संख्येने उपस्थित रहावं, असे आव्हान विश्व् हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदे दरम्यान करण्यात आहे.


यावेळी गजानन पांचाळ प्रांत संयोजक,महेश कुलकर्णी तालुकाध्यक्ष, ऋषिकेश गोगरोड, महेश ठकरोड, अविनाश डोपोड, मारोती जाधव, दुर्गेश फालके, पवनगीरी, कैलास बंडगर, तेजेश चौधरी, शिवशंकर देशमुख, आकाश ठक्करोड, किरण चौधरी यांची उपस्थिती होती.

# अकोले तालुक्यात काळी मिरीचा यशस्वी प्रयोग

**अकोले (समर्थ गांवकरी)**

■ आंब्याच्या झाडावरून दरवर्षी ५ हजारांची कमाई !

अकोले तालुक्यातील म्हाळादेवी येथील पत्रकार तथा औषधी वनस्पती अभ्यासक रामलाल हासे यांनी काळी मिरी लागवडीचा यशस्वी प्रयोग करून दाखविला आहे. “मसाल्यांची राणी” म्हणून ओळखली जाणारी काळी मिरी केवळ कोकणातील तांबड्या मातीतच येते, असा समज असताना त्यांनी आपल्या परसबागेतील आंब्याच्या झाडावर पाच वर्षांपूर्वी काळी मिरीची लागवड केली. शेतकी विभागाच्या मार्गदर्शनाखाली केलेला हा प्रयोग आता उत्पादन देऊ लागला आहे. काळी मिरी ही वेलवर्गीय व सदाहरित झाडांवर वाढणारी पिक असल्याने आंब्याच्या झाडाचा आधार घेत लागवड करण्यात आली. लागवडीनंतर दोन वर्षांतच उत्पादन सुरू झाले. पहिल्या तोडणीमध्ये ४ किलो ओली मिरी मिळाली, दुसऱ्या तोडणीस ८ किलो तर यावर्षी तिसऱ्या तोडणीमध्ये ९ किलो ओली मिरीफळे मिळाली. २४ मार्च रोजी तोडणी करण्यात आली असून वाळवण केल्यानंतर सुमारे ५ किलो सुकी मिरी मिळण्याची अपेक्षा आहे.



सध्या काळी मिरीचा बाजारभाव साधारण १००० रुपये प्रति किलो असल्याने एका आंबा झाडापासून दरवर्षी सुमारे ५ हजार रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळत आहे. या पिकासाठी वेगळा खर्च जवळजवळ शून्य असून आंब्याला दिले जाणारे खत व पाण्यावरच उत्पादन मिळत असल्याचे हासे यांनी सांगितले.

अकोले परिसरातील काळी व भुरकट जमिनीतही दर्जेदार काळी मिरी उत्पादन घेता येते, हे या प्रयोगातून सिद्ध झाले आहे. शेतकऱ्यांनी आपल्या परसबागेत किंवा शेतीतील आंबा झाडाजवळ काळी मिरीची लागवड करून अतिरिक्त उत्पन्नाचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच स्थानिक हवामानात तयार केलेली काळी मिरीची रोपे उपलब्ध असून इच्छुकांनी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

# पुरस्काराने अनंता महाले यांचा गौरव

**पालघर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद पालघरच्या शिक्षण विभाग (प्राथमिक) तर्फे सन २०२५ चा ‘जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार’ जाहीर करण्यात आला असून, जव्हार तालुक्यातील जि. प. शाळा आयरे येथील प्राथमिक सहशिक्षक अनंता पांडुरंग महाले यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गरीब कुटुंबातून येत संघर्षाच्या जोरावर उभे राहिलेले महाले हे अभ्यासू व समर्पित शिक्षक म्हणून ओळखले जातात. वेळेचे काटेकोर पालन, शांत स्वभाव, निर्मळ मन आणि विद्यार्थ्यांप्रती असलेला आदरयुक्त दृष्टिकोन यामुळे त्यांनी शिक्षक म्हणून वेगळी ओळख निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी राबवलेले उपक्रम, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी केलेले प्रयत्न तसेच समाजाभिमुख कार्य याची दखल घेत त्यांच्या नावाची निवड करण्यात आली.

# असेंट मेडिटेकने पुण्यात भव्य वितरक मेळाव्याद्वारे भागीदारी अधिक मजबूत केली

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

फ्लेमिंगो या विश्वासार्ह ब्रँडमागील कंपनी असेंट मेडिटेक लिमिटेडने नुकताच पुण्यात भव्य वितरक मेळावा आयोजित केला. या मेळाव्यात प्रदेशभरातील १८० वितरक सहभागी झाले होते. कंपनीच्या मजबूत वितरक नेटवर्कला अधिक बळकटी देण्याच्या आणि पुणे बाजारपेठेतील वाढत्या उपस्थितीच्या दृष्टीने हा कार्यक्रम एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. या कार्यक्रमास संस्थापक वसीएमडी श्री. राजीव मिस्त्री, प्रेसिडेंट – सेल्स अँड मार्केटिंग श्री. विवेक भटनागर आणि पश्चिम विभाग डीजीएम श्री. सचिन जोसाळकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या नेतृत्व आणि दूरदृष्टीमुळे संस्थेच्या वाढीला सातत्याने दिशा मिळत आहे. मोठ्या प्रमाणातील सहभागातून असेंट मेडिटेक आणि पुणे तसेच आसपासच्या बाजारपेठांतील वितरक यांच्यातील दृढ विश्वास आणि दीर्घकालीन संबंध अधोरेखित झाले. गेल्या काही वर्षांत फ्लेमिंगो ब्रँडने वेदना व्यवस्थापन, ऑर्थोपेडिक सपोर्ट आणि हेल्थकेअर आवश्यक वस्तूंमध्ये आपले ठोस स्थान निर्माण केले आहे. मजबूत स्थानिक भागीदारी आणि सातत्यपूर्ण बाजारपेठेतील सक्रियतेमुळे हा ब्रँड ग्राहकांची पसंती मिळवण्यात यशस्वी ठरला आहे. हा मेळावा केवळ संबंध साजरे करण्यासाठी नव्हे, तर आगामी आर्थिक वर्षासाठी धोरणात्मक नियोजन करण्यासाठीही महत्त्वाचे व्यासपीठ ठरले. पुणे आणि आसपासच्या भागात बाजारपेठेचा विस्तार, वितरण साखळी अधिक सक्षम करणे आणि ग्राहकांपर्यंत सहज पोहोच वाढवणे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. नेतृत्व टीमने भविष्यातील रोडमॅप, विकासाच्या योजना आणि वाढीच्या धोरणांची माहिती दिली. वितरकांना ब्रँडच्या पुढील विस्तारामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले. असेंट मेडिटेकने आपल्या प्रमुख भागीदारांचे विशेष कौतुक केले. यामध्ये नितीन सेल्स कॉर्पोरेशन (पुणे), महेश सर्जिकल अँड फार्मास्युटिकल्स (पीसीएमसी), नितीन डिस्ट्रीब्युटर, जय सर्जिकल अँड फार्मास्युटिकल, केमिस्ट केअर शॉपी, कल्पेश डिस्ट्रीब्युटर, श्री गणेश डिस्ट्रीब्युटर (अकलूज), न्यू पाटील फार्मा (पंढरपूर), नूतन एंटरप्रायझेस (सोलापूर), रुशभ सर्जिकल (पुणे), मल्हार सर्जिकल (पीसीएमसी) आणि नव महाराष्ट्र एंटरप्रायझेस (पुणे) यांचा समावेश आहे. विशेषतः नितीन डिस्ट्रीब्युटरचे श्री. राहुल भंडारी यांचा गेल्या १३ वर्षांपासूनच्या सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला. हे कंपनीच्या यशामागील दृढ आणि दीर्घकालीन भागीदारीचे प्रतीक आहे. या प्रसंगी नेतृत्वाने नमूद केले की फ्लेमिंगो ब्रँडची खरी ताकद केवळ उत्पादनांमध्ये नसून, वितरकांशी असलेल्या विश्वास आणि सहकार्यामध्ये आहे. कार्यक्रमाचा समारोप उत्साह, प्रेरणा आणि एकत्रितपणे अधिक मोठी उद्दिष्टे साध्य करण्याच्या निर्धाराने झाला.




# तेविसाव्या आठवड्यात जन्मलेले बाळ सुखरूप

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे येथील ‘सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल’मध्ये एक ऑक्टोबर २०२५ रोजी २३ व्या आठवड्यात जन्मलेल्या एका बाळाने मृत्यूवर यशस्वी मात केली. जन्माच्या वेळी या बाळाचे वजन अवघे ६७० ग्रॅम (साधारण एका पपईच्या आकाराचे) होते. या नवजात बालकाने रुग्णालयातील नवजात अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) १०४ दिवसांचा अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक प्रवास पूर्ण केला आहे. वेळेपूर्वी जन्म झाल्यामुळे या बाळाचे अवयव पूर्णपणे विकसित झाले नव्हते. त्यामुळे जन्मानंतरच्या पहिल्या काही तासांपासूनच त्याला ‘व्हेंटिलेटर सपोर्ट’, फुफ्फुसांच्या कार्यासाठी ‘सर्फॅक्टंट थेरपी’ आणि नवजात तज्ज्ञांच्या पथकाकडून सतत देखरेखीची गरज होती.

२३ व्या आठवड्यात जन्मणे हे जीवनासाठी अत्यंत उच्च जोखीम असल्याचे मानले जाते. या टप्प्यावर बाळ गर्भावस्थेच्या सहाव्या महिन्याच्या सुरुवातीला असते आणि फुफ्फुसे नुकतीच ‘सर्फॅक्टंट’ (फुफ्फुसे उघडी ठेवण्यास मदत करणारा पदार्थ) तयार करू लागतात. म्हणूनच अशा बाळांना श्वासोच्छवासासाठी तातडीच्या मदतीची गरज असते. या प्रकरणात, बाळाला जन्मतःच नळीद्वारे श्वसन आधार देण्यात आला आणि ‘एनआयसीयू’मध्ये हलवून ‘व्हेंटिलेटर’ आणि ‘सर्फॅक्टंट’चे दोन डोस देण्यात आले. भारतात दर वर्षी अंदाजे ३५ लाख मुले वेळेपूर्वी (प्रीटर्म) जन्माला येत असून, हे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. इतक्या लवकर जन्मलेली बाळं या एकूण संख्येचा एक अतिशय लहान भाग असतात. या बाळासमोर केवळ वेळेपूर्वी जन्माचेच नाही, तर एकापाठोपाठ येणाऱ्या अनेक वैद्यकीय समस्यांचेही मोठे आव्हान असते. उपचारादरम्यान १०४ दिवसांच्या बाळाला खालील समस्यांचा सामना करावा लागला

1. रक्तातील बुरशीजन्य संसर्ग.
2. फुफ्फुसांचा तीव्र आजार.
3. नवजात कावीळ आणि ॲनिमिया.
4. ‘नेक्रोटाइझिंग एन्टेरोकोलायटिस’ (आतड्याचा गंभीर आजार).
5. मदर्स टू फीटस सीएमव्ही संसर्ग (ज्यामुळे श्रवणदोष किंवा अपंगत्व येऊ शकते).
6. रेटिनोपॅथी ऑफ प्रीमॅच्युरिटी (डोळ्यांतील पडद्याच्या रक्तवाहिन्यांची असामान्य वाढ).

बाळाची त्वचा अत्यंत नाजूक असल्याने त्याच्या हाताळणीत बदल करण्यात आले होते. पहिल्या आठवड्यात छातीवरील त्वचा निघू लागल्याने विशेष जखमेची काळजी घेणारे उपचार, सिलिकॉन टेप आणि गुडघे, कोपर यांसारख्या भागांवर संरक्षक ड्रेसिंग वापरण्यात आले.

**१०४ दिवसांनंतर ‘एनआयसीआयू’मधून आले बाहेर; ‘सूर्या हॉस्पिटल’ची किमया**

बाळाला गर्भासारखे वातावरण मिळावे यासाठी ‘ह्युमिडिफाइड इनक्युबेटर’मध्ये ठेवण्यात आले होते. बाळावर एकाच वेळी अनेक उपचार सुरू होते, त्यामध्ये दीर्घकाळ श्वसन आधार, बुरशीविरोधी औषधे, काविळीसाठी फोटोथेरपी, रक्त संक्रमण, रक्तातील साखरेसाठी इन्सुलिन आणि नळीद्वारे पोषण यांचा समावेश होता. संसर्ग रोखण्यासाठी १:१ नर्सिंग रेशो (एका बाळासाठी एक परिचारिका), कमीत कमी हाताळणी, कमी प्रकाश आणि शांत वातावरण राखले गेले. ‘संबंधित बाळ आता आईचे दूध स्वतःहून घेत आहे. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात जेव्हा तपासणी झाली, तेव्हा त्याचे वजन समाधानकारक वाढले होते. ते आता हसते.

# द्विध्रुवीय मन समजून घेण्याची गरज : मीना राजपूत

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

बायपोलर मूड डिसॉर्डर हा केवळ साधा मूड स्विंग नसून, मेंदूशी संबंधित वैद्यकीय आजार आहे. योग्य उपचार आणि कुटुंबाचा आधार मिळाल्यास या आजारावर नियंत्रण मिळवून व्यक्ती यशस्वी आणि संतुलित आयुष्य जगू शकते. त्यामुळे द्विध्रुवीय मन समजून घेण्याची गरज आहे, असे मत समतोल बायपोलर मूड डिसऑर्डर आधार गटाच्या समन्वयक मीना वीरेन राजपूत यांनी व्यक्त केले. जागतिक बायपोलर दिनानिमित्त त्यांनी त्यांच्या पती विरेन यांच्या अनुभवातून या आजाराचे वास्तव मांडले. विरेन हे यशस्वी आणि कर्तृत्ववान व्यावसायिक असले, तरी त्यांच्या आयुष्यात मनःस्थितीचे टोकाचे बदल होत असत. ‘मॅनिया’च्या अवस्थेत त्यांच्यात प्रचंड ऊर्जा निर्माण होऊन ते सलग अनेक तास न झोपता काम करत, वेगाने बोलत आणि जोखमीचे निर्णय घेत असत.

# दमदार बॅटरी, मोठ्या डिस्प्लेसह रेडमी 15A 5G लाँच



### किंमत आणि उपलब्धता

रेडमी 15A 5G च्या 4GB + 64GB व्हेरिएंटची किंमत ₹12,999 पासून सुरू होते. 4GB + 128GB आणि 6GB + 128GB व्हेरिएंट्सची किंमत अनुक्रमे ₹14,499 आणि ₹16,499 आहे. हा स्मार्टफोन 3 एप्रिलपासून Flipkart, mi.com आणि अधिकृत शाओमी स्टोअर्सवर उपलब्ध होणार आहे.

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

शाओमी इंडियाने आज भारतीय बाजारात आपला नवीन स्मार्टफोन रेडमी 15A 5G लाँच केला आहे. दैनंदिन वापर लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आलेला हा स्मार्टफोन दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, मोठा डिस्प्ले आणि विश्वासार्ह कार्यक्षमतेसह ग्राहकांसाठी एक आकर्षक पर्याय ठरणार आहे. रेडमी 15A 5G मध्ये 6300 mAh क्षमतेची दमदार बॅटरी देण्यात आली असून, एकदा चार्ज केल्यानंतर हा स्मार्टफोन जवळपास दोन दिवस वापरता येतो, असा कंपनीचा दावा आहे. यासोबत 15W फास्ट चार्जिंग आणि 7.5W वायर्ड रिव्हर्स चार्जिंगची सुविधा देखील उपलब्ध आहे. या स्मार्टफोनमध्ये 6.9 इंचाचा मोठा डिस्प्ले देण्यात आला आहे, जो 120Hz रिफ्रेश रेटसह येतो. त्यामुळे स्क्रोलिंग, व्हिडिओ पाहणे आणि ॲप्स वापरण्याचा अनुभव अधिक स्मूथ आणि प्रतिसादक्षम होतो. 800 निट्स ब्राइटनेससह हा डिस्प्ले बाहेरील प्रकाशातही स्पष्ट दिसतो. वेट टच 2.0 तंत्रज्ञानामुळे ओल्या हातांनीही स्क्रीन सहज वापरता येते.

रेडमी 15A 5G मध्ये ऑक्टा-कोर 5G प्रोसेसर देण्यात आला असून, मल्टिटास्किंग, व्हिडिओ कॉलिंग आणि स्ट्रीमिंगसाठी तो सक्षम आहे. ड्युअल-बँड वाय-फाय, ब्लूटूथ 5.4 आणि अचूक नेव्हिगेशन सिस्टीममुळे कनेक्टिव्हिटी अधिक विश्वासार्ह बनते. या फोनमध्ये 32 मेगापिक्सल एआय ड्युअल रिअर कॅमेरा आणि 8 मेगापिक्सल फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. तसेच 200 टक्क्यांपर्यंत व्हॉल्यूम बूस्टसह स्पष्ट आणि दमदार ऑडिओ अनुभव मिळतो. हा स्मार्टफोन अँड्रॉइड 16 आधारित HyperOS 3.0 वर चालतो. कंपनीकडून 4 वर्षे अँड्रॉइड अपडेट्स आणि 6 वर्षे सिक्युरिटी अपडेट्स दिले जाणार आहेत.

# टोईंगने पुण्यात आपली पकड केली मजबूत

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

स्वस्त दरात फूड डिलीव्हरी करणारे ॲप टोईंगने आज जाहीर केले की, गेल्या 6 महिन्यात त्यांना ग्राहकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला आहे. टोईंग आपल्या ॲपवर खाण्यापिण्याच्या वस्तूंवर सर्वात कमी किमतीचे आश्वासन देते आणि हॉटेलमधील मेनू कार्डपेक्षा कमी किंवा त्याच्या बरोबरीने दर देण्याची खात्री देते. कंपनीने देशभरातील 3700 पेक्षा जास्त हॉटेल्सचे नेटवर्क तयार करून शहरात आपली पकड मजबूत केली आहे, ज्यामध्ये 300 प्रकारच्या डिश श्रेणींमधील 1,00,000 पेक्षा जास्त खाद्यपदार्थ उपलब्ध आहेत. बाजारात उपलब्ध असलेले टोईंग हे सर्वात स्वस्त दरात फूड डिलीव्हरी करणारे ॲप आहे. गेल्या 7 महिन्यात टोईंगचा विस्तार भारतातील 18 शहरांमध्ये झाला आहे. हे ॲप आग्रा, वडोदरा, गुवाहाटी, नाशिक, नागपूर, पटना, औरंगाबाद, भोपाळ, दिल्ली, गुरुग्राम, नोएडा, फरीदाबाद, गाझियाबाद, मुंबई, चंदीगड आणि अहमदाबादमध्ये सुरू झाले आहे. सर्वात कमी किमतीचे आश्वासन देण्यासोबतच, टोईंगवर कोणत्याही ऑर्डरसाठी पॅकेजिंग शुल्क किंवा प्लॅटफॉर्म फी घेतली जात नाही. ग्राहक बिर्याणी, बर्गर आणि बाऊल्स यांसारखे विविध पदार्थ 99 रूपयांपेक्षा कमी किमतीत ऑर्डर करू शकतात. टोईंगचे स्वस्त आणि परवडणारे दर खूपच यशस्वी ठरले आहेत, ज्यामुळे पुण्यातील नवीन नोकरी लागलेले तरुण आणि कॉलेज विद्यार्थ्यांसाठी पदार्थ ऑर्डर करण्यासाठी हे पहिले पसंतीचे ॲप बनले आहे.

# कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेडकडून नेतृत्व बदलाची घोषणा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेड (केएमपीएल) या कोटक महिंद्रा बँक लिमिटेडची उपकंपनी आणि वाहन वित्तपुरवठा क्षेत्रातील आघाडीच्या संस्थेने संचालक मंडळाकडून मंजूर केलेल्या नेतृत्व बदलाची घोषणा केली आहे.



संचालक मंडळाने श्री. सुरज राजप्पन यांची १ जून २०२६ पासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी सदस्यांच्या मंजूरीनुसार मॅनेजिंग डायरेक्टर आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून नियुक्ती केली आहे. श्री. सुरज राजप्पन यांनी कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेडमधून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. त्यांना या संस्थेतील विविध विभागांमधील २४ वर्षांचा दांडगा अनुभव आहे. सध्याचे मॅनेजिंग डायरेक्टर व सीईओ श्री. शाहरुख तोडीवाला हे कोटक ग्रुपमध्ये तीन दशकांहून अधिक काळ सेवा बजावल्यानंतर ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. कोटक महिंद्रा बँकेचे एमडी व सीईओ अशोक वासवानी म्हणाले, "शाहरुख यांनी कोटक महिंद्रा प्राइममध्ये विचारपूर्वक वाढ, जोखीम शिस्त आणि ग्राहक-केंद्रितता यांचा प्रबळ वारसा मागे सोडला आहे. आम्ही या नेतृत्वाच्या स्थानी सुरज यांचे स्वागत करतो. त्यांचा उद्योगातील सखोल अनुभव आणि कार्यक्षमता केएमपीएलला पुढील टप्प्यातील वाढीसाठी सज्ज करेल." केएमपीएलचे एमडी व सीईओ शाहरुख तोडीवाला म्हणाले, "केएमपीएलच्या ३० वर्षांच्या प्रवासाचा भाग असण्याचा आणि त्यांच्या वाढीत योगदान देण्याचा अनुभव अत्यंत समाधानकारक राहिला आहे. या कंपनीचे नेतृत्व करणे हा माझा बहुमान आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, सुरज आणि त्यांची लीडरशीप टीम या भक्कम पायावर अधिक प्रगती करतील आणि केएमपीएलला नवीन उंचीवर घेऊन जातील."

केएमपीएलचे नियुक्त एमडी व सीईओ सुरज राजप्पन म्हणाले, "मला संचालक मंडळाने माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाचे अत्यंत सन्माननीय वाटत आहे. केएमपील शिस्तबद्ध वाढ, नाविन्यता आणि सर्वोत्तम ग्राहक अनुभवावर लक्ष केंद्रित करणे सुरूच ठेवेल. तसेच, आम्ही सर्व ओईएम आणि डीलर भागीदारांसोबतचा सहयोग अधिक दृढ करू."

कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेडचा (केएमपीएल) वारसा १९९६ पासून दिसून येतो. कोटक महिंद्रा फायनान्स आणि फोर्ड क्रेडिट इंटरनॅशनल यांच्यातील ६०:४० अशा भागीदारीतून कोटक महिंद्रा प्राइमस लिमिटेड या नावाने ही कंपनी स्थापन करण्यात आली होती आणि भारतातील सर्वात पहिल्या संघटित कार-फायनान्स प्लॅटफॉर्मपैकी एक होती. २००५ मध्ये कोटक महिंद्रा बँकेने फोर्ड क्रेडिटचा हिस्सा विकत घेतला, ज्यामुळे ही कंपनी कोटक ग्रुपची पूर्ण मालकीची उपकंपनी बनली आणि त्यानंतर कंपनीचे नाव कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेड असे बदलण्यात आले.

गेल्या जवळपास तीन दशकांमध्ये भारतातील ऑटोमोटिव्ह आणि ग्राहक कर्ज बाजारपेठेसोबत केएमपीएल विकसित होत गेली आहे. ही संस्था जोखीम शिस्त, प्रशासन आणि संस्थात्मक सातत्य या मूल्यांवर आधारित आहे, तसेच कोटक ग्रुपच्या व्यापक आर्थिक सेवा परिसंस्थेशी नेहमीच संलग्न राहिली आहे.